रविवार, 24 जुलै 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 02
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • SUNDAY 24 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-02 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-14 • PRICE-5

## निकालापूर्वीच शिवसेना-राष्ट्रवादीचे ठरलेले, म्हणून ठाकरे फोन घेत नव्हते, फडणवीसांचा दावा



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याचा निर्णय अचानक झाला नाही, तर भाजप सत्तापिपासू नाही, हे दाखवण्यासाठी आधीपासूनच ठरले होते, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. निकालापूर्वीच शिवसेना-राष्ट्रवादीचे ठरले होते, त्यामुळे उद्धव ठाकरेंना फोन करुनही त्यांनी घेतले नाहीत, असा गौप्यस्फोट फडणवीसांनी केला. सेनापतीच्या मागे कार्यकर्ते भक्कम राहिले की लढाई जिंकतोच, मात्र तिकडे सेनापती झाले, आणि मागचे सरदार पळून गेले, अशा शब्दात फडणवीसांनी महाविकास आघाडी सरकारवर टीका केली. पनवेलमध्ये भाजप कार्यकारिणीच्या बैठकीत फडणवीस बोलत होते.

एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याचे अचानक ठरले नाही, तो निर्णय आधीपासूनच झाला होता. कुठलेही सरकार पाडून सत्ता स्थापन करणारे आम्ही नाही, भाजप सत्तापिपासू नाही, हे आम्हाला दाखवायचे होते. सत्तेसाठी नाही तर विचारांसाठी परिवर्तन झाले आहे. आमच्यासोबत षडयंत्र झाले, चंद्रकांतदादा आपण भोळे लोक आहोत. युतीच्या काळात आपण शिवसेनेविरोधातील बंडखोर उमेदवार मागे घेतले. पण निकालापूर्वीच शिवसेना-राष्ट्रवादीचे ठरले होते. निकालापूर्वीच आपले सर्व मार्ग खुले आहेत, असे शिवसेना नेते सांगत होते. उद्धव ठाकरेंना फोन करुनही त्यांनी घेतले नाहीत. नंबर गेमसाठी शिवसेनेने भूमिका घेतली नाही, असा दावा देवेंद्र फडणवीसांनी केला.

जनतेने निवडून दिलेले सरकार आता सत्तेत आले आहे. जशी माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी फारकत झाली तशी आता त्यांच्या पक्षाबरोबर झाली आहे. महाविकास आघाडी सरकारमध्ये पहिल्या ३० दिवसात केवळ स्थगिती देण्यात आली, आपल्या सरकारमध्ये केवळ प्रगती होत आहे, असेही फडणवीस म्हणाले.

**फडणवीसांची शेरोशायरी**

मेरी हिंमत को परखने की गुस्ताखी ना करना, पहले भी कही तुफानों का रोख मोड चुका हू मैं, अशी शायरी म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना इशारा दिला.

आधीच्या सरकारमध्ये लेना बँक होती, आता देना बँक आली आहे, असंही फडणवीसांनी सांगितले. अडीच वर्षांचा बॅकलॉग आपल्याला भरुन काढायचा आहे. विरोधीपक्षात असताना आपला पक्ष डिटेक्टिव्ह होतो, सरकारमध्ये आता सुपर ॲक्टिव्ह झालो आहोत. सेनापतीच्या मागे कार्यकर्ते भक्कम राहिले की लढाई जिंकतोच, तिकडे सेनापती झाले, मात्र मागचे सरदार पळून गेले, असा टोलाही फडणवीसांनी लगावला.

### चर्चेतली बातमी

## मुख्यमंत्रिपदाच्या फॉर्म्युलावरुन राज ठाकरे बरसले



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** चार भिंतीच्या आत मुख्यमंत्रिपद अडीच-अडीच वर्ष वाटून घेण्याचे कमिटमेंट झाल्याचे सांगता, मग पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जाहीर भाषणात देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री होणार, हे सांगितले, त्यावर आक्षेप का नाही घेतला? असा रोखठोक सवाल मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. ज्याचे आमदार जास्त, त्या पक्षाचा मुख्यमंत्री, हा युतीचा फॉर्म्युला ठरल्याची आठवण राज ठाकरेंनी करुन दिली. 'झी २४ तास' वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत राज ठाकरेंनी सद्य राजकीय परिस्थितीवर भाष्य केले. अमित शाह यांनी मातोश्रीवरील चार भिंतीत मुख्यमंत्रिपदाबाबत अडीच-अडीच वर्षांचे कमिटमेंट दिल्याचे तुम्ही सांगता, पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर भाषण केले होते, तेव्हा उद्धव ठाकरेही मंचावर उपस्थित होते. या निवडणुकीत महाराष्ट्राचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच होणार, असे मोदी म्हणाले होते. अमित शाहांचेही भाषण आहे, मग त्यावर तुम्ही आक्षेप का नाही घेतला? असा सवाल राज ठाकरेंनी विचारला.

## राजकारणात सहभागी व्हायचे होते

### सरन्यायाधीश रमणा यांनी सांगितला व्यक्तिगत आयुष्याचा प्रवास

आधुनिक केसरी न्यूज

**रांची : भारताचे सरन्यायाधीश एन.व्ही. रमण्णा यांनी तरुण असताना सक्रीय राजकारणात जाण्यासाठी उत्सूक होतो, अशी माहिती दिली. मात्र, नियतीला वेगळेच हवे होते, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी गावातील एका शेतकरी कुटुंबातील जन्म ते सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधीश या संपूर्ण प्रवासाची माहिती श्रोत्यांना दिली. ते शनिवारी (२३ जुलै) रांचीमधील झारखंड उच्च न्यायालयाच्या एका कार्यक्रमात बोलत होते.**

सरन्यायाधीश एन. व्ही. रमण्णा म्हणाले, माझा जन्म एका गावात शेतकरी कुटुंबात झाला. मी सातवी/आठवीत असताना इंग्रजी विषयाशी ओळख झाली. तेव्हा दहावी उत्तीर्ण होणे हे मोठे यश होते. बी. एससी पदवी घेतल्यानंतर माझ्या वडिलांच्या प्रोत्साहनामुळे मी कायद्याची पदवी घेतली. यानंतर मी विजयवाडा मॅजेस्ट्रेट कोर्टात वकिली करण्यास सुरुवात केली.

मी सक्रीय राजकारणात जाण्यासाठी उत्सुक होतो

रमण्णा पुढे म्हणाले, मी सक्रीय राजकारणात जाण्यासाठी उत्सुक होतो, पण नियतीला वेगळेच मान्य होते. ज्यासाठी खूप मेहनत घेतली ते सोडून देण्याचा निर्णय सोपा नव्हता. माझा वकिली ते न्यायाधीश बनण्यापर्यंतचा प्रवास सहज नव्हता. मागील अनेक वर्षे मी माझे करिअर लोकांच्या अवतीभोवती निर्माण केले. मात्र, वकिली सोडून न्यायाधीश होण्याचा निर्णय घेतल्यास मला



माझे सामाजिक आयुष्य सोडून द्यावे लागेल याची मला कल्पना होती. मी न्यायाधीश म्हणून मागील अनेक वर्षे माझे आयुष्य एकांतात घालवले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

### माझ्या वडिलांनी प्रोत्साहन दिले

विजयवाडामध्ये काही महिने वकिली केल्यानंतर पुन्हा एकदा माझ्या वडिलांनी मला प्रोत्साहन दिले आणि मी हैदराबादला आलो. येथे मी आंध्र प्रदेशच्या उच्च न्यायालयात वकिली केली. तेव्हा मला न्यायाधीश होण्याची ऑफरही मिळाली. मी तालुका स्तरापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत अनेक महत्त्वाच्या खटल्यांमध्ये काम केले. माझी माझ्या राज्याचा अतिरिक्त महाधिवक्ता म्हणूनही नियुक्ती झाली, अशी माहिती रमण्णा यांनी दिली.

### महत्त्वाची बातमी

## मंत्री पार्थ चॅटर्जी यांना ईडीकडून अटक



आधुनिक केसरी न्यूज

**कोलकात्ता :** पश्चिम बंगालमधील शिक्षक घोटाळासंबधी सक्तवसुली संचालनालय (ईडी) ने मंत्री पार्थ चटर्जी यांना अटक केली आहे. चटर्जी यांचे निकटवर्तीय असेलेल्या अर्पिता मुखर्जी यांच्या घरातून २० कोटी रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली होती. जप्त करण्यात आलेली ही रक्कम स्कूल सर्व्हिस कमिशन घोटाळ्याशी निगडित असल्याचा संशय ईडी व्यक्त केला आहे. ममता बॅनर्जी यांच्या मंत्रिमंडळात पार्थ चटर्जी सध्या उद्योग आणि वाणिज्य मंत्री आहेत. एसएससी घोटाळा झाला तेव्हा चटर्जी शिक्षणमंत्री होते. चटर्जी यांच्या निकटवर्तीय मानल्या जाणाऱ्या अर्पिता चटर्जी यांच्या घरावर ईडीने धाड टाकली. या कारवाईत ईडीने २० कोटी रुपयांची रोकड जप्त केली आहे. तसेच या रोख रकमेसह पोलिसांनी २० मोबाईल फोन जप्त केले आहेत.

## पुरंदरेंएवढा अन्याय छत्रपतींवर कुणीही केला नाही, रामदास आणि दादोजी कोंडदेवांचे योगदान काय?

### ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा परखड सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** बाबासाहेब पुरंदरेंची भाषणे आणि त्यांच्या लिखाणाएवढा अन्याय शिवछत्रपतींवर दुसरा कुणीही केला नाही, असे परखड मत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केले. तसेच शिवाजी महाराजांच्या जडणघडणीत रामदास स्वामी आणि दादोजी कोंडदेवांचे योगदान काय? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. शिवचरित्र ग्रंथ प्रकर्षण सोहळा आज पुण्यामध्ये पार पडला. त्यावेळी भाषणात ते बोलत होते. इतिहास अभ्यासक श्रीमंत कोकाटे लिखित शिवचरित्र आणि विचारप्रवाह या ग्रंथाचे प्रकाशन आज ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते पार पडले. यावेळी इतिहास अभ्यास राजकुमार घोगरे, श्रद्धा कुंभोजकर आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष छत्रपती शाहू महाराज उपस्थित होते.

**शिवछत्रपतींवर पुरंदरेंएवढा अन्याय कोणी केला नाही**

महात्मा फुले यांनी रायगडावरील शिवछत्रपतींची समाधी शोधली. त्यांनी शिवाजी महाराजांचा उल्लेख छत्रपती असा न करता 'कुळवाडी भूषण' असा केला. मात्र बाबासाहेब पुरंदरे यांनी खोटा इतिहास पसरवला. माझ्यामते शिवछत्रपतींवर इतका अन्याय कोणी केला नाही. शिवचरित्राच्या माध्यमातून घराघरात पोहोचलेल्या बाबासाहेबांच्या लिखाणातून छत्रपती शिवजी महाराजांवर सर्वाधिक अन्याय झाला, असे पवार म्हणाले.

**शिवाजी महाराजांच्या जडणघडणीत रामदास, दादोजी कोंडदेवांचे योगदान काय?**

अन्य घटकांचे महत्व वाढवण्याचे काम त्यांनी केले. मात्र रामदासांचे




योगदान काय, दादोजी कोंडदेवांचे योगदान काय? शिवाजी महाराजांना ज्यांनी दिशा दिल्या. त्या फक्त जिजाऊ होत्या. सत्य गोष्टी अनेकांना न पटणाऱ्या आहेत. त्यांच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही, असे पवार म्हणाले. पुरंदरेंनी जे काही लिखाण केले, जी काही मांडणी केली, ती मांडणी ज्याला सत्यावर विश्वास आहे तो घटक कधीही मान्य करणार नाही. काही व्यक्तींचे महत्व वाढवण्यासाठी त्यांनी विशेष काळजी घेतल्याचे दिसून येते, असेही पवार म्हणाले.

**सरकारने दादोजी कोंडदेव पुरस्कार देणे बंद केले**

राज्य सरकारने काही वर्षांपूर्वी गुरुजनांचा दादोजी कोंडदेव यांच्या नावाने पुरस्कार सुरू केला होता. त्यावर वाद झाला होता. त्यावर सरकारने समिती नेमली. त्यात दादोजी कोंडदेव आणि शिवाजी महाराज यांचा काहीही संबंध नसल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर सरकारने दादोजी कोंडदेव पुरस्कार देणे बंद केले, असे पवार म्हणाले.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## या सुखांनो या..

आधुनिक केसरी

आणि सुखाचा स्वीकार आपण जरा संकुचित मनानेच करतो. म्हणजे कसा ? तर आपण जे सुख किंवा यश मिळाले त्यावर समाधानी नसतो. उदा. आपल्या पाल्याला परीक्षेत ९० % गुण मिळाले, तर आपण म्हणतो, ' बस, इतकेच..? अजून थोडे हवे होते. ' आपल्याला एखादी सुटी मिळाली की आणखी हवी होती असे आपल्याला वाटते. असे आपले अनेक गोष्टींबाबत होते. म्हणजेच आपल्याला मिळालेल्या सुखाला आपणच एका अर्थी मर्यादित करतो. खरं म्हणजे उलट असायला हवं, नाही का ? पण ते नाही होत.

खरं म्हणजे सुख दुःखाकडे पाहण्याचा खूप व्यापक आणि सुंदर दृष्टिकोन आपल्याला भगवद्‌गीतेने आपल्याला दिलाय. त्यात स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगताना म्हटले आहे.

सुख दुःखे समे कृत्वा
लाभालाभों जयाजयो

म्हणजे जो स्थितप्रज्ञ असतो तो सुख दुःख, लाभ हानी, विजय पराजय यातील कोणतीही परिस्थिती असली तरी विचलित होत नाही. ही स्थितप्रज्ञाची अवस्था प्राप्त करणे तुम्हा आम्हा सर्वसामान्य माणसांना जरा कठीणच आहे. पण अशक्य नाही. पण मित्रांनो, मला वाटतं की आपल्या मनोधारणेत थोडा बदल केला तर आपल्या जीवनात तुम्हाला छोटे छोटे अनेक आनंदाचे प्रसंग आढळतील. आणि दुःखाच्या प्रसंगाकडे पण आपण थोड्या वेगळ्या दृष्टीने पाहू शकू.

मागे मी एक लेख वाचला होता. आता पूर्ण आठवत नाही. पण त्यात ज्याने तो लिहिला त्या माणसाला एकाच वर्षात खूप अडचणी, अडथळे येतात. आर्थिक मंदी येते, त्याच वर्षी नेमके त्याचे कसले तरी ऑपेरेशन होते, त्याला काही दिवस हॉस्पिटलमध्ये काढावे लागतात. एका बाजूने विचार केला तर ते वर्ष त्याच्यासाठी अत्यंत वाईट होते. पण तो दुसऱ्या बाजूने जेव्हा विचार करतो, तेव्हा त्याला वाटते की ही दैवाने दिलेली आपल्याला एक संधी आहे. मग तो आर्थिक प्रगतीच्या नवीन वाटा शोधतो, हॉस्पिटलमध्ये बेडवर पडल्या पडल्या चांगल्या पुस्तकांचे वाचन करतो. एका अर्थाने ते वर्ष त्याच्या जीवनात कायापालट घडवून आणते.

(क्रमशः)



## आनंदी पहाट

## संवादात मानसिक अडथळा नसावा

आधुनिक केसरी

मानसशास्त्रीय पातळीवर विचार केला तर भावनिक अडथळे म्हणजे एखाद्या व्यक्तीची मनोवैज्ञानिक स्थिती होय. ह्याचाच अर्थ म्हणजे मत व्यक्त करणे, दृष्टीकोन, स्थिती देहभान, भावना इत्यादींचा संदर्भ घेणे, जे प्रामुख्याने त्या व्यक्तीच्या संप्रेषणाच्या क्षमतेवर खोलवर परिणाम करते. संप्रेषण मुख्यत्वे एखाद्या व्यक्तीच्या मानसिक स्थितीवर अवलंबून असते, जर ती व्यक्ती मानसिक किंवा भावनिकदृष्ट्या योग्य नसेल तर तो प्रेषक किंवा प्राप्तकर्ता म्हणून प्रभावीपणे संवाद करू शकत नाही, असा अनुभव आपल्यापैकी अनेकांना येत असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

हे नेमके कशामुळे घडत असते, मुख्य प्रकारचे मनोवैज्ञानिक किंवा भावनिक अडथळे कोणते असू शकतात हे अभ्यासपूर्वक समजून घेणे आवश्यक आहे. त्यांपैकी लक्ष नसणे हे एक प्रमुख कारण असते. जेव्हा एखादी व्यक्ती इतर काही गोष्टींवर कब्जा घेत असेल आणि इतर व्यक्ती काय बोलत आहेत त्याकडे काळजीपूर्वक ऐकत नसेल तर संवादात मानसिक अडथळा निर्माण होतो. जेव्हा ती व्यक्ती इतरांचे ऐकत नाही, तेव्हा तो संदेश इच्छित असलेल्या संदेशास समजू शकणार नाही आणि योग्य अभिप्राय देऊ शकणार नाही. काही वेळा अकाली मूल्यांकन करण्यात येते, त्यामुळे देखील मानसिक अडथळा निर्माण होतो. माहितीचे हे अकाली मूल्यांकन प्रभावी संप्रेषणास अडथळा म्हणून कार्य करते आणि प्रेषकाचे मनोबल कमी करते. काही जणांच्या बाबतीत खराब धारणा अनावधानाने निर्माण होत असतात. धारणा स्मृतीत गोष्टी राखून ठेवण्यासाठी अथवा साठवण्याच्या मेंदूच्या क्षमतेचा संदर्भ देते. मेंदू सर्व माहिती साठवत नाही परंतू प्रत्यक्षात केवळ भविष्यात उपयुक्त ठरेल अशीच माहिती राखून ठेवते. म्हणूनच, धारणा प्रक्रियेदरम्यान बरीच माहिती गमावली जाते आणि हे प्रभावी संवादासाठी अडथळा म्हणून कार्य करते.


## गुरू आपल्याला अंतिम सुख दाखवितात

आधुनिक केसरी

एक लहान मुलगा एका विहिरीजवळ उभा होता. त्याची एक वस्तू आत पडली होती. 'ती काढण्याकरिता मी आत उडी मारतो,' असे तो म्हणू लागला. त्यावर तिथे होता तो एक मनुष्य म्हणाला, 'तू असे करू नकोस, आत पडून बुडून जाशील.' तरीपण तो ऐकेना, एवढ्यात त्याचा बाप तिथे आला. त्यानेही मुलाला पुष्कळ सांगून पाहिले, पण तो ऐकेना, मग त्या मुलाला बापाने धाक दाखवून आणि मार देऊन घरात नेले. आता, मुलाला मारले म्हणून तुम्ही बापाला दोष द्याल का ? "एकुलता एक मुलगा, नवस करून झालेला,त्याला जाऊ दिले असते तर काय झाले असते?" असे म्हणाल का? नाही ना ?

तर मग गुरू करी काय करीत असतो ? आपण विषय मागत असतो आणि ते दिले तर आपण त्यात बुडून मरू हे त्याला माहीत असते; म्हणूनच तो आपल्याला त्यातून वाचविण्यासाठी चार गोष्टी सांगून पाहतो. आपण तेही न ऐकले, तर तो आपत्ती वगैरे आणून धाक दाखवितो.

आपण त्याबद्दल रडत असलो तरी तो आपल्याला त्यातून वर ओढीतच असतो. आपण तर चांगले शिकले-सवरलेले; त्या मुलाप्रमाणे अज्ञान नसून चांगले वयस्कर; तरीसुद्धा आपल्याला



विषयात उडी घ्यावीशी वाटते. गुरूने सांगितले, 'लग्न करू नकोस', तर आपण 'लग्न कधी होईल' म्हणून त्याच्या पाठीस लागत असतो. आणि शेवटी तर 'गुरूला समजतच नाही' असे म्हणण्यापर्यंत आपली मजल जाते ! सध्या दिसते तेच सुख आपण खरे असे मानीत असतो. पण अंतिम सुख काय, हे गुरूला कळत असते. म्हणून तो सध्या दिसणाऱ्या सुखापासून आपल्याला परावृत्त करीत असतो. तेव्हा, आपण गुरुवचनावर विश्वास ठेवून त्याच्या आज्ञेप्रमाणे वागणे हेच श्रेयस्कर आहे. तो जे साधन सांगेल तेच करीत राहावे, म्हणजे आपल्याला अंतिम सुखाचा लाभ होईल. गुरू आज्ञा करतो म्हणजे काय करतो ? तर आपले मन जिथे गुंतले असेल तिथून त्याला काढण्याचा तो प्रयत्न करतो. भगवंत भक्ताची संकटे नाहीशी करतो, म्हणजे त्याची प्रापंचिक संकटे दूर करतो असे नाही. ती काय, सहज दूर करता येतात; पण भक्ताला समाधानात ठेवून संकटे सहन करण्याची शक्ति भगवंत देतो. भक्ताला तो नेहमी स्मरणात ठेवतो. असे भक्तच संतपदाला पोहोचतात.

एकाद्या विद्वान माणसाची विद्वत्ता ओळखायला आपण थोडे तरी विद्वान झाले पाहिजे, त्याप्रमाणे, संत ओळखायला संतांच्या ठिकाणी असणारा गुण थोडा तरी आपल्या ठिकाणी असला पाहिजे. संतांचा मुख्य गुण म्हणजे, ते भक्तिला चिकटलेले असतात. सत्पुरुषांचे बाहेरून वागण्याचे प्रकार त्यात्या देशकालमानाने निरनिराळे असतात, पण आतले भगवंताचे प्रेम मात्र सर्वांचे एकच असते. प्रापंचिक जन विषयप्राप्तीसाठी झटतात. पण विषयमागूनही जो देत नाही, त्यापासून परावृत्त करतो, तो संत.

## संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-31

## करू द्या...

आधुनिक केसरी

लहान मुलांना मोठ्यांची काम करायला फार आवडते. मोठी झाली की मग ते काम करायचा कंटाळा. पण लहानपणी भारी हौस असते. पोळ्या लाटणे, झाडून घेणे, देव देव्हाऱ्यातून खाली ठेवणे, कपड्यांच्या घड्या मोडणे, बेडशीट, सोफा कव्हर ओढून घेणे, बूट-चप्पल अस्ताव्यस्त करणे, झाडावरच्या कळ्या तोडणे, पाने तोडणे,नको ते तोंडात घालने, मोठी चप्पल घालने, मोठा चष्मा लावणे, जड ओझे उचलण्याचा प्रयत्न करणे, पाहिजे म्हणून हट्ट धरणे अशा कितीतरी गोष्टी आहेत ज्या लहान मुलांना करू नये असं आपल्याला वाटतं. पण त्यांना ते करण्याची हौस वाटते. कारण त्यांच्यासाठी ते नवीन असतं. त्यांना ते करून बघायचं असतं आणि करू दिले पाहिजे. मुलांना अनुभव मिळतो.

शिकायला मिळतं. ज्या त्या वयात मुलांना योग्य त्या गोष्टी करू द्या. करायला लावा. करून घ्या. कधी प्रेक्षक तर कधी मार्गदर्शक व्हा. मुलांचे भविष्य उज्वल घडवायचं असेल तर मुलांना थोडा दर्जेदार वेळ देऊन सगळ्या गोष्टी करण्याचा त्यांना आनंद घेऊ द्या. आधी घरातली कामे मग बाहेरची कामे, मित्रांना मदत, मोठ्यांना मदत, शेजाऱ्याना मदत हे सगळे मुलांना मोकळेपणाने करू द्या. नंतर ते आपोआप समजासाठी सुद्धा काहीतरी करतील. देता-देता, करता-करता मुलांना काहीतरी चांगलं करण्याची सवय लागत जाईल. फक्त आई-वडील कुटुंबच नव्हे तर समाजाचे सुद्धा आपण देणे लागतो याची त्यांना जाणीव होईल. आपल्या कमाईत सुद्धा कोणाचा तरी चांगला हिस्सा असतो हे कळेल.स्वार्थासाठी न जगता दुसऱ्यांसाठी सुद्धा आपण जगले पाहिजे अशी भावना मुलांच्यात निर्माण करून त्यांना आदर्श माणूस घडवूया...

## “निरूपण”

आधुनिक केसरी

**ह.भ.प. डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांचे नीतिशतक निरूपण हे सदर वाचकांच्या दृष्टीने लोकप्रिय असे सदर ठरले. शास्त्रीजींची निरुपण शैली प्रासादिक आहे. सरळ सोपे शब्द, आवश्यकतेनुसार दैनंदिन जीवनातील उदाहरणे आणि मोजक्या शब्दांत अधिकाधिक आशयाची मांडणी अशी वैशिष्ट्ये शास्त्रीजींच्या लेखन शैलीची आपल्याला जाणवतात. आणि म्हणूनच आजपासून डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांचे “निरूपण” हे नवीन सदर सुरु करीत आहोत. या सदरात विविध संतांचे अभंग, प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन काळातील संस्कृत मराठी श्लोक आणि त्यांचे अर्थ निरुपण असे स्वरूप या सदराचे असणार आहे. सहृदय वाचक आधुनिक केसरीच्या या नवीन उपक्रमाचे स्वागत करतील, या अपेक्षेसह ......!**

### अभंग

**एक तटस्थ मानसीं । एक सहज चि आळसी ॥१॥**
**दोन्ही दिसती सारिखीं । वर्म जाणे तो पारखी ॥ध्रु.॥**
**एक ध्यानीं करिती जप । एक बैसुनि घेती झोप ॥२॥**
**एकां सर्वस्वाचा त्याग। एकां पोटासाठीं जोग ॥३॥**
**एकां भक्ति पोटासाठीं । एकां देवासवें गांठी ॥४॥**
**वर्म पोटीं एका । फळें दोन म्हणे तुका ॥५॥**

एक जण मनाने नामस्मरण करीत आहे, म्हणून तटस्थ बसला आहे, तर दूसरा आळसामुळे तटस्थ बसला आहे. अशा दोन्ही लोकांची शारीरिक स्थिती सारखीच असली, तरीही त्यांच्यामध्ये काय फरक आहे, तो जाणकाराला कळतो. एक डोळे मिटून भगवंताचे ध्यान करीत असतो, तर दूसरा बसून झोप घेत असतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

एक सर्वस्वाचा त्याग करुन साधू होतो, तर दूसरा पोटाची खळगी भरण्यासाठी साधू होतो. एकजण पोटासाठी भक्ती करतो. तर एकाचा संबंध हा देवाशी असतो. अभंगाच्या शेवटच्या चरणात जगद्‌गुरू तुकोबाराय म्हणतात की, दोघांचेही शारीरिक अवस्था सारख्या असल्या, तरी मनोवस्था म्हणजे मनाच्या अवस्था / स्थिती मात्र भिन्न असतात. आणि म्हणून दोघांना मिळणारे फळ देखील भिन्न असते. या अभंगात जगद्‌गुरू संत श्री तुकोबारायांनी प्रतिपादन केले की, शारीरिक अवस्थे पेक्षा मानसिक अवस्था महत्वाची असते. भगवंताच्या भक्तीत दिखाऊपणा कामाचा नसतो. दिखाऊपणामुळे कदाचित पोटापाण्याची सोय होईल, पण श्रेष्ठ अशा प्रकारचे जे हित, ते साधले जाणार नाही.

आयुष्याच्या या साधने | सच्चिदानंद पदवी घेणे || असे जे उद्दिष्ट आहे, ते दिखाऊपणामुळे मिळत तर नाहीच, पण ऊलट आपण त्यापासून दूर जाऊ. म्हणून आपण अखंड सावधान असले पाहिजे.

क्षणोक्षणी हा चिकरावा विचार । तरावया पार भवसिंधु ॥१॥
नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ॥धृ.॥
संतसमागमीं धरुनि आवडीं । करावी तांतडी परमार्था ॥२॥
तुका म्हणे येह लोकीच्या वेव्हारे । नये डोळे धुरे भरोनि राहो॥३॥

या अभंगातही जगद्‌गुरू तुकोबाराय आपल्याला सावध करीत आहेत.

## रूप पाहता लोचनी....

आधुनिक केसरी

आळंदीहून निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ता ही चार भावंडं पहिल्यांदा ज्या वेळी पंढरपूरला आली त्या वेळी विठोबाचं दर्शन घेताना त्यांना खूप आनंद झाला. या आनंदाचं वर्णन करताना शेजारी उभ्या असलेल्या मुक्ताला ज्ञानदेव म्हणाले,
"रूप पाहता लोचनी, सुख झाले वो साजणी.."
मुक्ताला ते कौतुकानं साजणी म्हणत आहेत...
त्यावर मुक्तानं विचारलं,
"दादा, विठोबाचं रूप पाहून तुम्ही सुखी झाला तसं इतर लोकांना विठोबाचं दर्शन घेतल्यावर सुख का मिळत नाही...?"
तुम्ही म्हणता,
"तो हा विठ्ठल बरवा, तो हा माधव बरवा.." तसं इतर लोकांना का वाटत नाही...?
त्यावर ज्ञानोबा म्हणाले,
"मुक्ते, ‘बहुत सुकृतांची जोडी, म्हणूनी विठ्ठले आवडी..."
अगं मुक्ता, "पूर्व जन्मीची पुण्याई असेल तरच ईश्वराची आवड उत्पन्न होते..." म्हणजे नीती धर्माचे आचरण, ईश्वराची उपासना आणि शुद्ध मनाने जीवनाची वाटचाल केली असेल तरच या जन्मी ईश्वराची आवड उत्पन्न होईल.



तुला सांगतो, "सर्व सुखाचे आगर हा विठोबाच आहे... हा विठोबा केवळ मूर्तीत नसून चराचरात भरलेला आहे..."

हा अनुभव ज्ञानेश्वरांनी घेतला, त्या वेळी ते म्हणतात,
"अजी सोनियाचा दिनू, वर्षे अमृताचा घनू, हरी पाहिला रे हरी पाहिला रे.."
हे सुख काय आहे याची आपल्याला कल्पना नसते...
तुकारामांना हा अनुभव आला त्या वेळी त्यांनी अभंग लिहिला,
"आनंदाचे डोही आनंद तरंग.."
नामदेवांना अनुभव आला त्या वेळी त्यांनी अभंग लिहिला,
"सुखाचे हे सुख श्रीहरी मुख, पाहता भूक तहान गेली...’"
संत अमृतराय म्हणतात, "अजी मी ब्रह्म पाहिले, अगणित सुरगण वर्णीति ज्यासी, कटीकर नटसम, चरण विटेवरी..."
संत सेना महाराज म्हणतात,
"जाता पंढरिसी सुख वाटे जीवा, आनंदे केशवा भेटताची..."
आपण पाहतो सर्व संतांना विठोबाला पाहून खूप आनंद होतो.
असा आनंद आपल्याला मिळण्यासाठी, ज्ञानेश्वर महाराज आपल्याला सांगतात,
"संतांचे संगती, मनोमार्ग गती,
आकळावा श्रीपती, येणे पंथे..."
संतांची संगत, त्यांचे ग्रंथ, यामुळे मन निर्मळ होते आणि मन निर्मळ झाले की ईश्वराची आवड उत्पन्न होते.
म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, "काय वानू मी या संतांचे उपकार, मज निरंतर जागविती...."

# इतरांच्या संदर्भात अनुदार उद्गार काढल्याने आपण मोठे होत नाही



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**ईतरांच्या बद्दल चांगलं बोलण्यासाठी प्रयत्न खुप करावे लागतात. परंतु इतरांच्या बद्दल अशोभनीय भाषा तोंडुन सहज निघते. अगदी प्रयत्न केले तरी ही कळत न कळत आपण इतरांच्या बदल काहीतरी बोलून जातोच हा एक सर्वसाधारण सवयीचा भाग म्हटलं तरी चालेल. खुप कमी अपवादात्मक लोक या सवयींपासून स्वतःला अलिप्त ठेवण्यात यशस्वी होत असतात. तसं या सवयी पासुन स्वतःला दुर ठेवणं वाटत तितकं सहज सोपं नसतं. कारण समाजव्यवस्था आणि आपण मिळुन सगळेच अशा युगात वावरतोय जिथ स्वतःला वगळता इतरां बद्दलच मत स्थिर नसुन ते वारंवार आणि परस्थितीनुसार बदलत असतं आणि म्हणून याच दरम्यान वापरण्यात येणारी भाषा खुप महत्वाची असते.**

दरम्यान आपल्या भाषेवरून त्या शब्दावरून किंवा इतरांच्या बदल आपलं काय मत आहे. त्यावरून आपलं मुल्यमापन ठरत असतं. मोठं होणयाच स्वप्न पाहण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. या मध्ये काही दुमत नाही किंवा कहीच गैर नाही. परंतु इतरांच्या बाबातीत अवहेलनात्मक चर्चा केलेल्याने किंवा अनादरणीय उदगार काढल्याने आपण मोठे आहोत असा त्याचा अर्थ होत नाही. आपल्या सोबत जो व्यक्ती आहे जो समुह आहे त्यांना छोटेपणाची जाणीव होऊ न देणे म्हणजे आपण ख-या अर्थाने मोठे आहेत. आपल्या सोबत असणा-याला जर छोटेपणाची जाणीव झाली. तर मग मात्र आपल्या मोठेपणाला फार किंमत नाही.

मोठं होण्यासाठी प्रयत्न करणं अहोरात्र प्रयत्नांची पराकाष्ठा करण हा अंत्यंत योग्य मार्ग आहे. परंतु हल्ली एक नवीन प्रथा-परंपरा आपल्यला पाहायला मिळत आहे. आपण कोणा बदल बोलतोय आणि काय बोलतोय कशासाठी बोलतोय याचा नेमका आणि योग्य अर्थ बोलणाराला माहित नाही. हे अतिशोक्ती नाही तर वास्तव आहे.

वाणी आणि पाणी हे अगदी जपून वापरले पाहिजेत असे आपले धर्म संस्कार आणि धर्म शास्त्रानुसार सांगितले आहे. पण आपण नेमकं सध्या या मुख्य विचारांना बगल देऊन आचरण करतोय वागतोय. आपण इतरांच्या संदर्भात काय बोलतो याला खुप महत्व असतं. प्रत्यक्ष किंवा अपरोक्ष आपण इतरांच्या संदर्भात अनादरणीय बोलण्याने आपला मोठेपणा सिद्ध होत नाही. आणि या पद्धतीने तो सिद्ध करण्याचा प्रयत्न करणं म्हणजे सुद्धा वेडेपणा म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. आपल्या पेक्षा सर्व बाबतीत वरचढ श्रेष्ठ व्यक्तिमत्वाबद्दल किंवा आपल्यापेक्षा लहान सर्वच बाबतीत कनिष्ठ असणार-या बद्दल अनादरणीय उदगार काढल्याने आपण खूप ज्ञानी आहोत महान आहोत किंवा श्रेष्ठ आहोत असं अजिबात होत नाही. कारण आपला मोठेपणा हा आपल्या वाणीतून प्रकट होत नाही. तर तो कृतीतून आणि कर्तत्वातून प्रकट होतो.

शेवटी बोलणं आणि कृती करणं यामध्ये जमिन-असमानच अंतर असतं. सुसंकृत बोलणं आणि टिंगल टवाळी म्हणून बोलण यामध्ये सुद्धा फरक असतो. सुसंस्कृत बोलणारा व्यक्ती कधीच चुकुन सुद्धा कोणाबद्दल टिका टिप्पणी करणारं नाही. किंवा अशा संवादात चर्चात सहभागी होणार नाही.जेवढं शक्य असेल तेवढे इतरांच्या संदर्भात त्याच्या तोंडून गौरव उदगारच निघाणर हे सुसंकृत व्यक्तिमत्वाच मुख्य लक्षण आहे. आणि जो व्यक्ती इतरांच्या संदर्भात नेहमी सदैव अनादरणीय उदगार काढतो. म्हणजे तो ज्याच्या बद्दल उदगार काढले त्याच्यापेक्षा श्रेष्ठ आहे असं होतं नाही. म्हणून आपल्या पेक्षा कोणी लहान असो वा मोठा असो आपल्या शब्दांनी इतरांमधे सकारात्मक उर्जा निर्माण होऊन मनात स्नेह, भाव, आदर, आनंद-हर्ष निर्माण झाला पाहिजे......!

# बनावट ईनो पाऊचची खुलेआम विक्री करणाऱ्या व्यावसायिकावर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज


**अमरावती :** बनावट ईनो पाऊचची खुलेआम विक्री करणाऱ्या शहरातील एका व्यवसायिकावर ईनो कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या मदतीने लक्ष्मीनगर परिसरात कारवाई केली. घनशाम हरीचंद्र लालवानी (४०) रा. मणीपूर लेआऊट, शोभानगर) असे त्या व्यावसायिकाचे नाव आहे. या प्रकरणात मुंबई येथील नेट्रीका कन्सल्टींग इंडिया प्रा. ली. चे प्रतिनिधी विजय उत्तम पवार (४२) यांनी शुक्रवारी गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली. त्यानुसार पोलिसांनी घनशाम लालवानीविरुद्ध कारवाई केली. पोलिसांनी कॉपी राईट कायद्यान्वये गुन्हा नोंदवला आहे.

ॲसिडीटी कमी करण्यासाठी अनेक नागरिक 'ईनो' पितात. ईनोचे पाऊच मेडिकल आणि किराणादुकानांवरही उपलब्ध आहे. पण अमरावतीत लक्ष्मीनगरातील साक्षी ट्रेडर्स नावाच्या दुकानात 'ईनो'च्या बनावट पाऊचची विक्री होत असल्याची माहीती मिळाली होती. यानंतर नेट्रीका कन्सल्टींग प्रा. कंपनीच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिसांच्या सहकार्याने 'ईनो'चे अनेक बनावट पाऊच जप्त केले आहेत. 'ईनो'चे बनावट पाऊच विकले जात असल्याची माहिती कंपनीचे प्रतिनिधी विजय पवार यांना मिळाली होती. साक्षी ट्रेडर्समध्ये जाऊन प्रथम त्यांनी 'ईनो'चे बनावट पाऊस विक्री होत असल्याची शहानिशा केली. त्यानंतर त्यांनी या घटनेची माहिती गुन्हे शाखेच्या पोलिसांना दिली. या माहितीवरून गुन्हे शाखेचे पथक व सदर कंपनी प्रतिनिधींनी लक्ष्मीनगरातील साक्षी ट्रेडर्सवर धाड टाकली. त्यावेळी तेथे उपस्थित घनशाम लालवानी यांच्या दुकानात 'ईनो'चे बनावट पाऊचचे ४३२ बॉक्स (प्रत्येक बॉक्समध्ये १२ पाऊच) जप्त केले.

पोलिसांनी पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा करून संबंधित कंपनीचा प्रतिनिधी यांच्या तक्रारीवरून बनावट 'ईनो' पाऊचची विक्री करणाऱ्याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या ताब्यातून २ लाख ३३ हजार २८० रुपयांचा बनावट 'ईनो'चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याच्याविरुद्ध कॉपीराईट कायदा तसेच अन्य कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.





# बॉलिवूड सितारों के शनि रहस्य





आधुनिक केसरी

जगातील एकमेव शनि साधिका व प्रसिध्द जोतिषाचार्या डॉ. विभाश्री दीदी यांनी नुकतेच बॉलिवूड़ जगतातील सर्व प्रमुख आघाडीच्या कलाकार, प्रोडयुसर, डायरेक्टर, संगीतकार तथा अन्य चित्रपट कलावंतांच्या जन्म कुंडलिवर प्रकाशझोत टाकून संपुर्ण चित्रपट क्षेत्राचे लक्ष वेधून घेतले आहे. डॉ. विभाश्री दीदी यांचा ज्योतिश्य विषयावरील अभ्यास दांडगा आहे, त्यामुळे भविष्य जाणून घेण्यासाठी त्यांच्याकडे संपुर्ण भारतातून श्रद्धाळू येतात, तसेच त्यांचे भारतातच नव्हेतर परदेशातही अनेक ठिकाणी मोटीवेशनल कार्यक्रम झाले आहेत.

डॉ. विभाश्री दीदी यांना शनिदेवांची विशेष कृपा आहे, या पुस्तकात बॉलिवूड़च्या एकूण 108 कलाकारांच्या जन्मपत्रीकेवर प्रकाश टाकण्यात आला आहे त्यात प्रमुख्याने अमिताभ बच्चन, ऐश्वर्या राय, सनी देओल, सलमान खान, पुनित इस्सार, संगीतकार प्यारेलाल, उषा मंगेशकर, तारक मेहता का उल्टा चष्मा फेम दयाशंकर पाण्डेय, सुरेंद्र पाल, साहिल चढ्ढ़ा, युवराज पराशर, अनुप जलोटा, शब्बीर खान, सुदेश भोसले, शैल हंडा, श्रीकांत नारायण आदि चित्रतारकांच्या पत्रिकांवर विश्लेशण केले आहे.

मार्च 2011 मधे प्रसिद्ध गायकांनी गायलेल्या शनि जगराता या शनिभजनाच्या सीडीचे प्रसारण मुंबईतील प्रसिध्द शण्मुखानंद हॉल येथे अनेक दिग्गज गायकांच्या उपस्थितीत झाला होता व औरंगाबाद येथील शनिआश्रम येथे सुध्दा याचे प्रकाशन करण्यात आले होते. आत्तापर्यंत डॉ. विभाश्री दीदी यांचे अध्यात्मिक माहितीवर 25 पुस्तके प्रकाशित झाली आहेत. औरंगाबादमधील सिडको येथील ठाकरेनगरमधे शनिमंदीरात दर शनिवारी संध्याकाळी 7 ते 8.30 या वेळात डॉ. विभाश्री दीदी आपल्या भक्तांना शनि ज्ञान देतात तसेच आध्यामिक विषयावर प्रवचन देतात आजपर्यंत लाखों साधकांनी याचा फायदा घेतला आहे. डॉ. विभाश्री दीदी यांच्या चिकलथाना येथे 4 एकर जागेत शनिआश्रम आहे, येथेच त्यांनी आयुर्वेदीक वनस्पतींची बाग तयार केली आहे व नवग्रह मंदीर आहे. या ठिकाणी रामानंद सागर यांचे पुत्र प्रेम सागर यांनी शनिदेवावर आधारित टीव्ही सिरियल्स बनविल्या आहेत.

**अधिक माहितीसाठी संपर्क करा**

श्री शनि मंदिर, एन-2, सिडको (ठाकरे नगर) रोड श्री शनी आश्रम चिखल्याणा, औरंगाबाद औरंगाबाद (महा.) 431003

Ph. 0240-2471558,9422704358, ई-मेलः DRVIBHASHRI08@GMAIL.COM



# कामभावना, लैंगिकता आणि अनैतिकता



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**सभ्यता विकसनाच्या प्रक्रियेत आपण सर्व प्रकारचे स्वातंत्र्य मिळवून स्वतःवर काही बंधने लादून घेतली. ही मोठी विलक्षण गोष्ट आहे. चौकटी बाहेरचा निसर्ग आणि आतले विश्व यात आदान प्रदान होऊ नये, हा यामागचा मानस. पण माणसाला चौकटी तोडून जगण्यात नेहमीच मजा आलेली आहे. कर्तृत्व म्हणा मर्दुमकी म्हणा ती दाखविण्याची संधी चौकटी तोडण्यातच आहे, ही त्यामागची प्रबळ धारणा. कामभावना, लैंगिकता हे चौकटीतले विषय तर अनैतिकता कथित मर्दुमकीचा विषय ठरल्यास आश्चर्य ते काय?**

सामाजिक सौहार्द टिकून रहावा आणि बेबंदशाही माजू नये म्हणून विवाह नामक संस्था फार पूर्वीपासून अस्तित्वात आणली गेली. भारतीय विवाह संस्थेचा इतिहास वाचताना आपणांस आज जाणवणारी अनैतिकता त्याकाळी सभ्यता होती, असेच म्हणावे लागेल. म्हणजे सभ्यपणा आणि नैतिकता या बाबी स्थळकाळपरत्वे बदलणाऱ्या आणि विकसनशील स्वरूपाच्या असतात. प्राप्त माहितीनुसार चौथ्या पाचव्या शतकात लिहिलेला वात्सायनांचा कामसूत्र हा निकोप कामजीवनावरील महाग्रंथ पौर्वात्य प्रदेशात कामाच्या संदर्भात जी खुली चर्चा व्हायची त्याचे द्योतक ठरतो. संयमित काम जीवनाबद्दल, सामाजिक लैंगिक प्रश्नाबद्दल समाजात जागरूकता होती. लैंगिक विचार म्हणजे अश्लीलता हा विचार फार अलीकडचा. पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्यानंतर आता आता कोठे त्याविषयी मुलांना शालेय अभ्यासक्रमामधून माहिती दिली जावी का? अशी चर्चा होत आहे. एखाद्या वस्तूला आपण प्रदर्शित कसे करतो, यानुसार ती मनःपटलावर आंदोलीत होत असते. जर तुमचे संपूर्ण व्यक्तित्वच त्याने झंकारत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही आणि त्याचा अव्हेरही करता येणार नाही. सिग्मंड फ्रॉइडचे अख्खे आयुष्य या संशोधनातच गेले. कामभावना ही नैसर्गिक प्रबळ भावना आहे. आज वाढत्या स्पर्धेमुळे, जगण्याच्या अस्थिरतेमुळे तरुणांचे लग्नाचे वय मोठ्या प्रमाणात वाढले, वाढत्या वयाची म्हणून काही मागणी असते, त्याची पूर्तता होऊ शकली नाही की मग समाजात अनैतिकता निर्माण होते. लैंगिक नीती आणि समाज या नावाचे श्री के क्षीरसागर यांचे एक महत्त्वाचे पुस्तक आहे. जिज्ञासूंनी ते जरूर अभ्यासावे. लैंगिकता आणि अश्लीलता यात आपण जोपर्यंत फरक करणार नाही, तोपर्यंत ही कोंडी फुटणार नाही. आपण विरोधाभासात जगतो. चकचकीत रस्ते बनवायचे, सुसाट वेगाने पळणाऱ्या गाड्यांची निर्मिती करायची आणि वेगमर्यादा तोडल्यास दंडही ठोठावायचा. दूरचित्रवाणीवरून अश्लील, कामोत्तेजक अंगविक्षेप करणारे प्रदर्शन करायचे, पुरुषी अंडरपॅन्टच्या जाहिरातीत अर्धनग्न ललना दाखवायची आणि समाज फार अश्लील, अनैतिक झाला म्हणून सरकारी




पातळीवरून मूल्यशिक्षणही द्यायचे. हा दुटप्पीपणा होय. आपण म्हणायला काहीही म्हणत असलो तरी, समाज तमाशाने बिघडत असतो आणि कीर्तनाने सुधारत असतो. प्रमाण कमी जास्त हाच काय तो फरक असेल. प्राचीन भारतात नग्नता होती, कामभावना विषयक विचार होता, मैथुनाच्या संदर्भात संशोधन होते याची साक्ष खजुराहोच्या शिल्पाकृतीमधून दिसून येते. पण अश्लीलता अथवा कामोत्तेजकता नव्हती, बीभत्सपणा नव्हता किंवा त्यात अनैतिकही काही नव्हते. कारण हे सर्व निकोप दृष्टिकोनातून निर्माण झालेले होते. ती निकोपता कदाचित आज परत येणारही नाही. याचा अर्थ आपण अश्लील, अनैतिक अथवा कामोत्तेजक वागले पाहिजे असा होत नाही. नैसर्गिक भावनांच्या दमनातून मानसिक आणि सामाजिक अराजकता निर्माण होत असते. कार्यातील गुंतलेपण दुसरा कोणताच विचार डोक्यात येऊ देत नाही, पण ही परिस्थिती कोणी तयार करायची? स्थिर समूहाला निश्चित ध्येय कधी नसते म्हणून तर शासनाची निर्मिती झाली. व्यक्तिगत ध्येय गाठल्यानंतर किंवा त्याचा विचारही न करता माणूस हवा तसा वागायला मोकळा असेलही पण समूह म्हणून काही एक ध्येय असले पाहिजे. जेणेकरून कामभावनेमध्येच अडकून पडलेली देशवासीयांची ऊर्जा सकारात्मक दिशेकडे परिवर्तित होऊ शकेल. ओशोंनी संभोगातून समाधीकडे या चिंतन मालिकेची मुंबईला सुरुवात केली तेव्हा श्रोते देखील पळायला लागले, अशी आख्यायिका आहे. म्हणजे आजही आम्ही या विषयावर मुक्तपणे बोलू शकत नाहीत, ऐकू शकत नाहीत. ओशोंचे वरील व्याख्यानाचे पुस्तक देखील आहे. आपल्या कपोलकल्पित धारणा तोडण्यास ते पुरेशे आहे. काम संसार | अंतरी हे करकर असे तुकाराम महाराज म्हणतात तेव्हा हा संपूर्ण संसार कामाचाच तर विस्तार असल्याचे प्रतिपादन करतात. महादेवाने कामदेवाला आपल्या तिसऱ्या नेत्राने जाळूनही संसारात काम शिल्लक असेल तर त्याकडे दुर्लक्ष करून किंवा त्यापासून पळ काढून जमणार नाही. चारचौघात अनौपचारिक गप्पा मारण्याचे विषय त्याभोवतीच घुटमळत असतील आणि विनोदाच्या तळाशी विसंगतीसोबतच कामप्रेरणा असेल तर ती किती महत्त्वाची आहे, हेही जाणले पाहिजे. कामभावनेचे व्यवस्थापन असा विषय कदाचित आपणांस येत्या काही काळात शिकण्याची निकड भासू शकते. अपल्याएवढा मनाचा विचार इतरत्र कोठे झाला नाही, हे खरे असले तरी त्याच मनातील कोणत्या विचाराला खतपाणी घालायचे आणि कोणत्याचे दमन करायचे, यातही आपण पारंगत झालो आहोत. त्याचे दुष्परिणाम आज सामाजिक अंगाने तपासण्याची वेळ आली आहे. पाश्चात्य जगतात याविषयीचे एक खुले वातावरण आहे, चर्चा केली जाते. आपल्याकडे मात्र तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी परिस्थिती. समाजाने इष्ट अनिष्टाचा विचार जरूर करावा पण हा विषय दुर्लक्ष करण्यासारखा नक्कीच नाही. सुरेश भट म्हणतात त्याप्रमाणे, आज मोकळे होऊ आज मोकळे बोलू, जीव एकमेकांचा जाळणे बरे नाही.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

## बोंबाबोंब कशासाठी?

**सुखी कामजीवनाच्या गुरुकिल्ल्या चोरून समुपदेशीत करण्यापेक्षा संपूर्ण समाजालाच याविषयी जागृत केले तर असंख्य श्रमतास आपण वाचवू शकतो आणि विधायक, रचनात्मक कार्यासाठी ते वापरू शकतो. गरज आहे ती समूहाला निश्चित ध्येय देण्याची. लैंगिकता आणि अश्लीलता यात फरक करून शास्त्रीय स्वरूपाची माहिती सर्वत्र पोहचविण्याची आज नितांत गरज आहे. अन्यतः आजचा तरुण सर्वार्थाने कामातून जाईल. आणि तरुणांचे असे कामातून जाणे देशाला कोमात जाण्यापासून कोणी रोखू शकणार नाही.**

# गरज निर्यात वाढवण्याची



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**जेव्हा एखादा देश आयातीपेक्षा जास्त निर्यात करतो तेव्हा चांगली परिस्थिती मानली जाते. याचा परिणाम व्यापार अधिक्या (ट्रेड सरप्लस) वर होतो, अन्यथा देशाला व्यापार तुटीचा सामना करावा लागतो. भारत सध्या याच समस्येला तोंड देत आहे. पूर्वी आपली निर्यात वाढली असली तरी आयातीवरील आपले अवलंबित्व खूप जास्त आहे. निर्यातीबरोबरच भारतातील आयातीतही विक्रमी वाढ झाली आहे. व्यापार तुटीनेही आतापर्यंतचे सर्व आकडे ओलांडले आहेत. कच्चे तेल आणि सोन्याच्या आयातीवर देशाला मोठा खर्च करावा लागतो. देशांतर्गत गरजांमुळे काही वेळा आयात कमी करणे शक्य होत नाही आणि जर ते कमी करता आले तर मर्यादित प्रमाणातच. त्यामुळे देशाची व्यापारी तूट कमी करायची असेल, तर निर्यात वाढवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.**

कोणत्याही देशाची निर्यात आणि आयात त्याच्या सकल देशांतर्गत उत्पादनावर (जीडीपी) परिणाम करते. जर आयात जास्त असेल आणि व्यापार तूट वाढत असेल तर देशाच्या चलन विनिमय दरावर विपरित परिणाम होतो. जेव्हा देशाच्या चलनात कमजोरी पाहायला मिळत असते तेव्हा निर्यात वाढवणे आणि आयात करणे महाग असते. याउलट, जेव्हा देशांतर्गत चलन मजबूत असते तेव्हा त्याचा निर्यातीवर भार पडतो आणि आयातीसाठी कमी किंमत मोजावी लागते. महागाईचा दर जास्त असल्यास वस्तूंच्या किमती आणि मजुरी वाढल्यामुळे निर्यातीवर विपरीत परिणाम होऊ शकतो.

गेली दोन वर्षे जवळपास सर्वच देशांसाठी कठीण आणि अनिश्चित होती. आता जग या कठीण परिस्थितीतून सावरत आहे. केंद्र सरकार 31 मार्च 2023 रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षासाठी वास्तववादी निर्यात लक्ष्य निर्धारित करू इच्छित आहे. परंतु अती महत्त्वाकांक्षी लक्ष्ये निश्चित करण्यात अडचणी येत आहेत कारण जागतिक वाढीचे अंदाज उत्साहवर्धक नाहीत. रशिया-युक्रेन युद्धामुळे पुरवठा आणि व्यापारातील अडचणींमुळे जागतिक विकास दर 2020-21 या आर्थिक वर्षातील 5.7 टक्क्यांवरून या वर्षी 2.9 टक्क्यांपर्यंत घसरेल, असा विश्वास जागतिक बँकेने व्यक्त केला आहे.चिंतेची बाब म्हणजे इकडे भारताचा परकीय चलनाचा साठा कमी होत आहे. ऑक्टोबर 2021 मध्ये देशात 642 अब्ज डॉलरचा परकीय चलन साठा होता, जो आता 590 अब्ज डॉलरवर आला आहे. विदेशी संस्थागत गुंतवणूकदार शेअर बाजारात विक्रीमध्ये गुंतल्याने हे आणखी कमी होऊ शकते. देशाला विविध कारणांसाठी परकीय चलनाची आवश्यकता असते, त्यातील एक म्हणजे आयात देयके. परदेशात शिक्षणासाठी गेलेल्या लोकांनाही तेथील सर्व खर्च परकीय चलनातच करावा लागतो. अशा परिस्थितीत सरकारला निर्यात वाढवून परकीय चलन मिळू शकते.

भारत ज्या वस्तूंची निर्यात करतो त्यामध्ये प्रामुख्याने सुती धागा, अभियांत्रिकी वस्तू, कॉफी, इलेक्ट्रॉनिक वस्तू, ताग आणि तागाच्या वस्तू, चामडे आणि त्यापासून बनविलेली उत्पादने, हस्तकला वस्तू, कपडे, प्लास्टिक इत्यादींचा समावेश होतो. देशात उत्पादित किंवा उत्पादित केलेल्या सर्व उत्पादनांच्या निर्यातीला चालना देण्यासाठी वेगवेगळ्या निर्यात संस्था आधीच स्थापन केल्या आहेत. उदाहरणार्थ, कृषी आणि प्रक्रिया केलेले अन्न उत्पादने निर्यात प्रोत्साहन परिषद, इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक सॉफ्टवेअर निर्यात प्रोत्साहन परिषद इ.जागतिक पातळीवर निर्यातीचा विचार येतो तेव्हा बांगलादेश आणि चीनचा उल्लेख होणे स्वाभाविक आहे. बांगलादेश हा जगातील प्रमुख निर्यातदार देश म्हणून उदयास येत आहे. चीनचा विचार केला तर आज आपल्यापैकी क्वचितच असा कोणी असेल जो चीनमध्ये बनवलेली उत्पादने वापरत नाही. लवकर तुटणाऱ्या किंवा खराब उत्पादनांसाठी चीनची कधी कधी खिल्ली उडवली जाते, पण सामान्यतः गुणवत्तेशी तडजोड न करणाऱ्या ॲपलसारख्या कंपन्या चीनमध्ये मोबाईल फोन आणि इतर ॲक्सेसरीज बनवून जगभर विकतात,तेव्हा त्याची काही ठिकाणी अनुकूल बाजूही पाहायला मिळते. . मात्र, आता अनेक छोटे देश चीनला आव्हान देण्यात गुंतले आहेत. व्हिएतनाम, तैवान, दक्षिण कोरिया, मेक्सिको आणि काही प्रमाणात मलेशियानेही



जागतिक निर्यातीत आपला ठसा उमटवला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची कधीच निर्यातकेंद्रित अर्थव्यवस्था म्हणून ओळख झाली नाही. 1991 मध्ये देशात उदारीकरण सुरू झाल्यापासून, भारताची आर्थिक वाढ खाजगी आणि सार्वजनिक कंपन्यांच्या गुंतवणुकीमुळे आणि सामाजिक-आर्थिक विकास योजनांवर सरकारच्या खर्चामुळे चालते. मालाच्या निर्यातीने यात केवळ सहायक भूमिका बजावली आहे. आता आमच्या निर्यातीचा मोठा भाग सेवांचा आहे. माहिती तंत्रज्ञानात भारताच्या मजबूत स्थानानंतर, विकसित आणि जगातील इतर देशांमध्येही माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित सेवांची मागणी वाढली आहे. भारत कायदेशीर सेवा देखील निर्यात करतो. सध्या देशाच्या एकूण निर्यातीत सेवांचा वाटा 40 टक्क्यांहून अधिक आहे. देशातील सेवा क्षेत्राच्या विस्ताराचा वेगही लक्षणीय आहे. सेवा निर्यात 2021-22 मध्ये 254 अब्ज डॉलर होती, 2020-21 मधील 206 अब्ज डॉलरच्या तुलनेत ती 23 टक्क्यांनी वाढली आहे. जागतिक स्तरावर वस्तूंच्या निर्यातीत भारताचा वाटा कधीही दोन टक्क्यांपेक्षा जास्त नव्हता. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक लोकसंख्येचा देश असताना, हा निर्यातीचा वाटा नगण्य असल्याचेच म्हटले जाईल. आपण आतापर्यंत जगात मालाच्या निर्यातीत आपला ठसा उमटवू शकलो नाही, त्याचे एक कारण म्हणजे वस्तूंच्या मोठ्या प्रमाणात उत्पादनात मागे राहणे हे आहे. सरकारच्या धोरणांमध्ये वारंवार होणारे बदल हे गुंतवणुकदारांना अनिश्चिततेचा सामना करावा लागत आहे. इतर कारणांमध्ये कर दरांमधील अस्थिरता, नियमांमध्ये वारंवार होणारे बदल आणि धोरणे बदलणे यासारख्या घटकांचा समावेश होतो. व्यवसाय करण्यास सुलभतेचे दावे केले जात आहेत, परंतु प्रत्यक्ष ठिकाणी परिस्थिती पाहिजे तशी बदललेली नाही. निर्यात वाढवण्यासाठी विविध क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करून त्यांच्यासाठी बाजारपेठेनुसार धोरण तयार करावे लागेल. औषधे, दागिने आणि रसायनांच्या निर्यातीसाठी जागतिक बाजारपेठ खुली आहे. एका अंदाजानुसार, आपण वर्षाला अठ्ठावन अब्ज डॉलर्स किमतीचे हिरे आणि दागिने निर्यात करू शकतो, मात्र सध्या प्रत्यक्ष निर्यात फक्त तीस अब्ज डॉलर्सची आहे. भारताने 2030 पर्यंत एक लाख कोटी रुपयांच्या मालाची निर्यात करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.2019-20 च्या आर्थिक सर्वेक्षणात असे म्हटले आहे की निर्माण क्षेत्रातील वस्तू जोडण्याच्या बळावर भारत जागतिक निर्यात बाजारपेठेतील आपला वाटा 6 टक्क्यांपर्यंत वाढवू शकतो आणि यामुळे सुमारे 8 कोटी नवीन रोजगार निर्माण होऊ शकतात. निर्यात-केंद्रित युनिट्सच्या स्थापनेसाठी सरकारने आधीच धोरणे आणि प्रोत्साहन दिले आहे. आता गरज आहे ती तुलनेने मागासलेल्या भागात अशी नवीन युनिट्स स्थापन करण्याची. साहजिकच त्यासाठी मूलभूत सुविधा या ठिकाणी उपलब्ध करून द्याव्या लागतात. यासाठी गुंतवणूक करावी लागेल. परंतु अशा गुंतवणुकीचा परतावा दीर्घकालीन असेल. सर्वात मोठा फायदा आजूबाजूच्या लोकांना रोजगार मिळवून देण्यात दिसेल. खासगी आणि सरकारी पातळीवर रोजगार निर्मितीसाठी निर्यात वाढीसाठी मदत घेण्यासाठी धोरण तयार करण्याची गरज आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा दु:खमय जीवनप्रवास



सुनील शिरपुरे, यवतमाळ
संपर्क क्र. 7057185479

आधुनिक केसरी

**ही कहाणी आहे एका शिक्षिकेची, झुंजार आदिवासी महिलेची, निस्वार्थी समाजसेविकेची, अध्यात्मिक प्रवासाची, जिद्दी समर्पित जीवनाची. काल-परवा पर्यंत फारसे कोणाला माहीत नसलेले द्रौपदी मुर्मू यांचे नाव आज खूपच चर्चेत आहे. राष्ट्रपतीपदाची त्यांची उमेदवारी घोषित होईपर्यंत तसे त्यांचे नाव अज्ञात होते. एका आदिवासी, गरीब, सामान्य कुटुंबातील महिलेला राष्ट्रपतीपदासारख्या सर्वोच्च पदाची उमेदवारी मिळते, हीच मुळी आपल्या शक्तीशाली लोकशाहीची थक्क करणारी सुंदर साक्ष आहे. भारतासारख्या खंडप्राय देशाच्या राष्ट्रपतीपदाच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांचा जीवनप्रवास थक्क करणारा आहे. विशेषतः सर्वच स्त्रियांना द्रौपदी मुर्म यांचा जीवनसंघर्ष भावूक करणारा व प्रेरणादायीही आहे. घराणेशाही, अमर्याद संपत्ती आणि खानदानाचा दर्प नसलेल्या सामान्य माणसाला अभिमान वाटावा अशीच कहाणी ही द्रौपदी मुर्मू यांची आहे.**

ओडिसा या एका आदिवासीबहुल राज्याच्या नागरिक असलेल्या द्रौपदी मुर्म आता देशाच्या १५ व्या नामनियुक्त राष्ट्रपती बनल्या आहेत. त्यांचा संपूर्ण राजकीय आणि वैयक्तिक जीवनप्रवास म्हणजे अविरत संघर्षाची कहाणी होय. आपली निवड या सर्वोच्च पदासाठी होईल, असे त्यांना स्वप्नातही वाटले नव्हते. त्यामुळेच जेव्हा एनडीएने त्यांना राष्ट्रपती पदासाठी उमेदवार म्हणून निवडले, तेव्हा क्षणभर त्यांचा यावर विश्वासच बसला नव्हता.
ही कहाणी आहे एका शिक्षिकेची, झुंजार आदिवासी महिलेची, निस्वार्थी समाजसेविकेची, अध्यात्मिक प्रवासाची, जिद्दी समर्पित जीवनाची. काल-परवा पर्यंत फारसे कोणाला माहीत नसलेले द्रौपदी मुर्मू यांचे नाव आज खूपच चर्चेत आहे. राष्ट्रपतीपदाची त्यांची उमेदवारी घोषित होईपर्यंत तसे त्यांचे नाव अज्ञात होते. एका आदिवासी, गरीब, सामान्य कुटुंबातील महिलेला राष्ट्रपतीपदासारख्या सर्वोच्च पदाची उमेदवारी मिळते, हीच मुळी आपल्या शक्तीशाली लोकशाहीची थक्क करणारी सुंदर साक्ष आहे. भारतासारख्या खंडप्राय देशाच्या राष्ट्रपतीपदाच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांचा जीवनप्रवास थक्क करणारा आहे. विशेषतः सर्वच स्त्रियांना द्रौपदी मुर्म यांचा जीवनसंघर्ष भावूक करणारा व प्रेरणादायीही आहे. घराणेशाही, अमर्याद संपत्ती आणि खानदानाचा दर्प नसलेल्या सामान्य माणसाला अभिमान वाटावा अशीच कहाणी ही द्रौपदी मुर्मू यांची आहे.
ओरीसा राज्यातील मयुरभंज जिल्ह्यातील बैदापोसी गावातील एका अत्यंत सामान्य आदिवासी कुटुंबात त्यांचा जन्म २० जून १९५८ रोजी झाला. त्यांचे वडील आणि आजोबा हे दोघेही गावचे सरपंच होते. त्यामुळे त्यांना राजकिय बाळकडू घरातूनच मिळाले. भुवनेश्वर येथील रमादेवी महिला महाविद्यालयातून त्यांनी कला शाखेची पदवी घेतली. नंतर १९७९ ते १९८३ या काळात त्यांनी वीज आणि सिंचन खात्यात कारकून म्हणून नोकरी केली. त्यानंतर मुलीच्या आग्रहाखातर त्यांनी अध्यापक म्हणून सेवा बजावली. मग यथावकाश त्यांनी राजकारणात प्रवेश केला. घराणेशाही नाही, संपत्ती नाही, वारसा नाही, पण सारेच कसे थक्क कणारे आहे. आजही त्या मयुरभंज येथे एका साध्या दुमजली घरात राहतात.
नगरसेविका, आमदार, राज्य सरकारमधील मंत्री व राज्यपाल अशा राजकीय पदावर त्यांनी काम केले आहे. त्या १९९७ मध्ये रायरंगपूर नगर पंचायतीच्या नगरसेवक म्हणून निवडून आल्या. पाठोपाठ २०००-२००४ आणि २००४-२००९ मध्ये रायरंगपूर विधानसभा मतदारसंघातून विधानसभेवर निवडून गेल्या.
याखेरीज त्यांनी भाजपच्या अनुसूचित जमाती मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्षपदही भूषवले आहे.
द्रौपदी मुर्मू यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केल्यानंतर सामाजिक प्रश्न सोडविण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले. याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांनी बालपणापासून सोसलेले गरिबीचे चटके. २०१६ मध्ये रांचीतील कश्यप मेडिकल कॉलेजद्वारा आयोजित केलेल्या 'रन ऑफ व्हिजन' कार्यक्रमात त्यांनी नेत्रदानाची घोषणा केली होती. वास्तविक त्यांना लहानपणापासून गरिबीचा सामना करावा लागला, तरी त्यांनी याचा कधीच उल्लेख केला नाही. दलित, आदीवासी, लहान मुले यांच्या उत्थापनासाठी झटणा-या द्रौपदी मुर्मू यांची वैयक्तिक जीवनात अनेक संकटामुळे अक्षरशः होरपळ झाली. कुणीही कोलमडले असते, तशा त्याही कोलमडल्या. पण पुन्हा ऊभ्या राहिल्या आणि ताठ ऊभ्या राहिल्या.
द्रौपदी मुर्मू यांच्या जीवनात २०१० ते २०११ हा कालखंड म्हणजे साक्षात कालपर्व ठरला. या कालावधीत त्यांच्या लक्ष्मण नावाच्या थोरल्या मुलाचा गूढरीत्या मृत्यू झाला. हा धक्का त्यांना सहन झाला नाही. त्यामुळे त्या डिप्रेशन मध्ये गेल्या. जीवनातील सारेच स्वारस्य निघून गेल्यामुळे त्या पूर्णतः खचुन गेल्या.



याचवेळी त्या प्रजापिता ब्रम्हकुमारी या अध्यात्मिक संस्थानात गेल्या. त्या अध्यात्माला शरण गेल्या. त्यानंतर कशाबशा पुन्हा उभ्या राहिल्यात. तोच धाकटा मुलगा बिरंची २०१३ साली रस्ता अपघातात ठार झाला. त्याच महिन्यात आई गेली, कर्तबगार भाऊही गेला. चार वर्षात जवळची सगळी माणसे हरवली. पाठोपाठ १ ऑक्टोबर २०१४ रोजी त्यांचे पती शामचरण यांनाही देवाज्ञा झाली. त्यापूर्वी म्हणजे १९८४ साली त्यांची तीन वर्षाची गोजिरवाणी कन्या अचानकपणे मरण पावली होती. एकापाठोपाठ बसलेल्या या धक्क्यांमुळे द्रौपदी मुर्मू निराशेच्या गर्तेत ढकलल्या गेल्या. नियतीने त्यांच्यावर घोर अन्याय केला. परंतु अध्यात्म त्यांच्या सोबत होते. त्यामुळे हळूहळू त्या यातून सावरल्या आणि दलित, आदिवासी यांच्या सेवेत स्वतःला झोकून दिले. स्वतःचे दुःख जगाच्या दुखात मिसळून टाकले आणि पुन्हा ताठपणे ऊभ्या राहून नव्या जोमाने काम करू लागल्या.
२०१५ साली झारखंडच्या पहिल्या महिला राज्यपाल म्हणून पाच वर्षे काम केले. लवकरच विनम्र स्वभावाच्या कठोर प्रशासक म्हणून त्यांचा लौकिक झाला. १९२१ पर्यंत त्या राज्यपाल होत्या. २० जून रोजी त्यांचा वाढदिवस होता आणि २१ जूनला भारताच्या राष्ट्रपतीपदासाठी त्यांच्या नावाची घोषणा झाली. त्यांना आणि देशालाही हा आनंदाचा धक्का होता. त्या नेहमी प्रमाणे शिवमंदीरात गेल्या. स्वतः झाडू घेऊन मंदीर स्वच्छ केले. मंदीरातील कर्मचा-यांबरोबर सुखसंवाद केला. मयुरभंजमध्ये जल्लोष झाला.
द्रौपदी मुर्मू भारताच्या पहिल्या आदिवासी आणि दुस-या महिला राष्ट्रपती बनल्या आहेत. यापूर्वी प्रतिभा देवीसिंह पाटील या एकमेव महिला राष्ट्रपती राहिलेल्या आहेत. यापूर्वी कधीही राष्ट्रपतीपदी अनुसूचित जमातीची स्त्री किंवा पुरुष कार्यरत झालेले नाही. अर्थात, अनुसूचित जातीचे दोन राष्ट्रपती झाले असून, ते के. आर. नारायणन आणि विद्यमान राष्ट्रपती रामनाथ कोविंद आहेत.
द्रौपदी मुर्मू यांनी शामचरण मुर्मू यांच्याशी लग्न केले. या दाम्पत्याला दोन मुले आणि एक मुलगी झाली. दोन्ही मुलांचे व त्यांच्या पतीचे देखील निधन झाले आहे. आता त्यांच्या कुटुंबात मुलगी इतिश्री, नातू आणि जावई आहेत. द्रौपदी मुर्मू यांचा प्रेमविवाह झाला होता. त्यावेळी द्रौपदी यांच्या वडिलांना हे लग्न मान्य नव्हते. त्यामुळे बैदापोसी गावात शामचरण यांना तब्बल तीन दिवस डेरा टाकावा लागला होता. द्रौपदी या संथाल समाजाच्या आहेत. शामही त्याच समाजाचे होते. या समाजात मुलीच्या कुटुंबाला मुलाला हुंडा द्यावा लागतो. दोन्ही घरची मंडळी एकत्र बसून हुंडा किती व काय द्यावा हे ठरवतात. त्यावेळी चर्चेत असे ठरले की, हुंड्यात एक गाय, बैल आणि १६ जोडी कपडे वर पक्षाने वधू पक्षाला द्यायचे. त्याला शामचरण यांनी लगेच होकार दिला आणि नंतर म्हणजे १९८० मध्ये दोघांचा विवाह झाला.
द्रौपदी मुर्मू यांचा शपथविधी २५ जुलै रोजी होईल. ज्या दिवशी त्या शपथ घेतील, त्या दिवशी त्यांचे वय ६४ वर्षे ३५ दिवस असेल. त्यामुळे त्या सर्वात कमी वयाच्या राष्ट्रपती बनतील. आतापर्यंत सर्वात कमी वयाचे राष्ट्रपती होण्याचा विक्रम नीलम संजीव रेड्डी यांच्या नावावर आहे. ते राष्ट्रपती झाले, तेव्हा त्यांचे वय ६४ वर्षे २ महिने आणि ६ दिवस होते. द्रौपदी मुर्मू या एका लहानशा घरातून ३५० एकर परिसर, १९० एकर बगीचा व ७५० कर्मचारी असलेल्या प्रशस्त राष्ट्रपतीभवनात लवकरच जातील. एक सामान्य शिक्षिका भारताची राष्ट्रपती होईल. हे भारतीय लोकशाहीचे केवढे नितांत सुंदर व विलोभनीय रुप आहे बरे!

# सामाजिक बांधिलकीची शिकवण देणारं 'आधारवड'




अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**ज्येष्ठ पत्रकार श्री. वा. नेर्लेकर यांनी ठाणे जिल्ह्यात असणाऱ्या अनेक सामाजिक संस्थांना प्रत्यक्ष भेटी देऊन, त्यांच्या कामाची, उपक्रमांची स्वतः पाहणी करून माहिती संकलित केली आणि ती शब्दबद्ध करून पुस्तकरूपात आणली. एका वृत्तपत्रात लिखाण करून त्यांनी या संस्थांची ओळख करून दिली आणि याच लेखांचं हे पुस्तक तयार झाले. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, अध्यात्मिक, क्रीडा अशा विविध उद्देशाने निर्माण झालेल्या अनेक संस्था कार्यरत आहेत.नि:स्वार्थी वृत्तीने ह्या संस्था काम करतात. 'आधारवड' या पुस्तकातून ठाणे शहरातिला संस्थांचा परिचय प्रांजळपणे करून दिला आहे.**

लहानपणी मी, माझे एवढेच मानवाचे विश्व असते. मूल जन्माला आले की त्याचं कुटुंब एवढेच त्याचं जग असतं, पण जसजसे मूल मोठे होत जाते तसे ते समाजात वावरायला लागते. माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. समूहाने राहणे हा त्याचा स्वभाव आहे. मानवाची व्यक्ती म्हणून जी जडणघडण होते ती समाजात होते. आपण या समाजात वावरायला शिकलो, व्यक्तिमत्त्व घडलं म्हणून आपण या समाजाशी कटिबद्ध आहोत. आपण या समाजाचे ऋणी आहोत, या समाजाला आपण काहीतरी देणं लागतो, ही भावना मनात रुजू लागते तेव्हा 'सामाजिक बांधिलकी' ही संकल्पना जन्माला येते. फक्त मी, माझे कुटुंब एवढ्यापुरते मर्यादित न राहता समाजाशी संलग्न होऊन हा समाजच माझे कुटुंब आहे, ही भावना जपून काही लोक एकत्रित येऊन सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी सामाजिक संस्थांची स्थापना करतात. पण या संस्थांची माहिती प्रत्येकाला असतेच असे नाही. आपण येता - जाता कित्येक संस्था पाहिल्या असतील पण त्या संस्थेचा इतिहास माहितीच नाही.
ठाणे शहर हे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक या दृष्टीने महत्वाचे शहर आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेले हे शहर तलावांचे शहर म्हणून ओळखले जाते. अनेक दिग्गजांचा सहवास या शहराला लाभलेला आहे. कलेचे सांस्कृतिक वैभव म्हणजे ठाणे. ठाणे म्हटले की काय आठवते, मामलेदार मिसळ, गजानन वडापाव, गडकरी रंगायतन, घाणेकर नाट्यगृह, उपवन तलाव, मासुंदा तलाव (तलावपाळी), गोखले उपाहारगृह इत्यादी. यापलीकडे ठाण्यातील महत्त्वाचे अंग कोणते तर ठाण्यातील विविध संस्था. ठाणेकरांना या संस्था माहीत आहेत, पण यासोबतच नव्या पिढीला सुद्धा या संस्थांची ओळख व्हावी म्हणून लेखक, ज्येष्ठ पत्रकार श्री. वा. नेर्लेकर यांनी 'आधारवड' हे पुस्तक आपल्या भेटीस आणले आहे. ठाण्यातील संस्थांची परिपूर्ण परिचय करून हे पुस्तक म्हणजे खरोखरीच एक सांस्कृतिक ठेवा आहे. व्यास क्रिएशन्सने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. पुस्तकाचे शीर्षक किती समर्पक आहे पहा ! 'आधारवड' वडाचे झाड जसे मजबूत, त्याचा फांद्या विस्तीर्ण पसरलेल्या, मुळे जमिनीत खोलवर रूजलेली, वटवृक्षाची सावली जशी कायम सगळ्याना सुखावते, वटवृक्ष जसे शुद्ध प्राणवायू आपल्याला देतं. तशाच या विविध संस्था समाजात विस्तारलेल्या आहेत आणि आपल्या कार्याची सावली समाजावर धरलेली आहे. अशा या आधारवड असणाऱ्या संस्था म्हणजे ठाण्याची खरी ओळख आहे.ठाणे शहराच्या जडणघडणीत या संस्थांचे योगदान महत्वाचे आहे.
ज्येष्ठ पत्रकार श्री. वा. नेर्लेकर यांनी या संस्थांना प्रत्यक्ष भेटी देऊन, त्यांच्या कामाची, उपक्रमांची स्वतः पाहणी करून माहिती संकलित केली आणि ती शब्दबद्ध करून पुस्तकरूपात आणली. महाराष्ट्र टाइम्स या दैनिकातून त्यांनी या संस्थांची ओळख करून दिली आणि याच लेखांचं हे पुस्तक तयार झाले. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, अध्यात्मिक, क्रीडा अशा विविध उद्देशाने निर्माण झालेल्या अनेक संस्था कार्यरत आहेत. निःस्वार्थी वृत्तीने ह्या संस्था काम करतात. 'आधारवड' या पुस्तकातून ठाणे शहरातिला संस्थांचा परिचय प्रांजळपणे करून दिला आहे. ज्या संस्था कित्येक वर्षे कार्य करीत आहेत पण प्रसिद्धीच्या वलयापासून दूर आहेत, अशा संस्थांना प्रकाशात आणण्याचे , त्यांच्या कार्याला प्रकाशात आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य श्री. वा. नेर्लेकर यांनी या पुस्तकाद्वारे केले आहे. या विविध संस्थांची स्थापना , त्याचा इतिहास, संस्थेची पार्श्वभूमी, उद्दीष्टे,त्यांचे कार्य,राबविण्यात येणारे उपक्रम,कार्यक्रम आणि संस्थेच्या उत्कर्षासाठी अहोरात्र झटणारी माणसे अशी इत्यंभूत माहिती नेमकेपणाने मांडली आहे.या पुस्तकात ठाण्यातील ५० संस्थांचा परिचय करून दिला आहे.




श्री आनंद भारती समाज, आर्य क्रीडा मंडळ, श्रीकोपीनेश्वर मंदिर ट्रस्ट, ठाणे नगर वाचन मंदिर, प्रगती प्रतिष्ठान, मराठी विज्ञान परिषद, हरियाली, मावळी मंडळ, पर्यावरण दक्षता मंडळ, कोकण मराठी साहित्य परिषद, ब्राह्मण सभा, प्राच्य विद्या अभ्यास संस्था, मराठी ग्रंथ संग्रहालय, समतोल फौंडेशन, घंटाळी प्रबोधिनी, जागृती पालक संस्था, सन्मित्र ज्येष्ठ नागरिक संघ इत्यादी, अशा अनेक संस्थांचा परिचय या पुस्तकातून करून दिला आहे. वेगवेगळे उददेशाने निर्माण झालेल्या ह्या संस्था खरेच आधारवडाप्रमाणे कार्य करत असतात, समाजाला आधार देत असतात .त्यांची कामाची तळमळ, लोकांप्रति असलेली संवेदना, भावना या पुस्तकातून पानोपानी दिसून येतात. फार काही नाही तर एक छोटासा खारीचा वाटा उचलून आपणही सामाजिक बांधिलकी जपू शकतो ,ही प्रेरणा निर्माण करणारे हे पुस्तक आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या बऱ्याच जणांना कोणत्यातरी संस्थेला आर्थिक पाठबळ द्यायचं असतं पण संस्थांची पुरेशी माहिती त्यांना नसते.अशा व्यक्तींसाठी 'आधारवड' हे पुस्तक संस्थांची परिपूर्ण आणि नेमकी माहिती देणारे ठरेल.
हे पुस्तक वाचून , त्यातील संस्थांची कार्ये वाचून नक्कीच वाचकांच्या मनात समाजाप्रति सद्भावना जागृत होईल आणि आपणही सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी हातभार लावावा, ही भावना मनामनात रुजविण्याचं आणि खासकरून नव्या पिढीनेही हा वारसा जतन करावा,हा विचार त्यांच्या मनात रुजविण्याचं महत्त्वाचे काम श्री. वा. नेर्लेकर यांनी 'आधारवड' च्या माध्यमातून केले आहे. कोणतेही वैयक्तिक स्वार्थ न पाहता फक्त सेवा हा धर्म जोपासणाऱ्या, मानवी मूल्ये जपणाऱ्या आणि समाजाच्या हितासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या संस्था ह्या खऱ्या आधारवड आहेत.हे पुस्तक म्हणजे ठाणेकरांची ओळख आहे. हे पुस्तक नक्की वाचा ! ठाण्याचे एक वेगळे रूप ,एक वेगळी ओळख आपल्याला होईल, हे नक्की !
**लेखसंग्रह : आधारवड, लेखक : श्री. वा. नेर्लेकर, व्यास क्रिएशन्स.**

# !! लोणार सरोवराच्या तिरावरुन !!



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

आधुनिक केसरी

**संभाजीनगर पासून साधारणता १४० किलोमीटर अंतरावर बुलढाणा जिल्ह्यात लोणार सरोवर आहे. आज जागतिक ठेवा म्हणून जगाच्या नकाशावर लोणारचं नाव देशविदेशातील पर्यटकांना देखील माहित झालेलं आहे. भारताचा प्राचीन इतिहास आपण जर पाहिला तर दंडकारण्याचा भाग म्हणून विदर्भाच्या या भूमीचा उल्लेख आपणास आढळतो. जगाच्या इतिहासामध्ये जी मोठी खगोलशास्त्रीय घटना घडली त्यामधून लोणारच्या सरोवराची निर्मिती झाली असे संदर्भ आपणास वाचाव्यास मिळतात. लोणार सरोवर हे जगातील तिसऱ्या क्रमांकाचे विवर आहे. या सरोवराचा अंदाजे साडेसहा किलोमीटरचा आहे. जगामधील बेसॉल्ट खडकापासून तयार झालेले हे एकमेव सर्व म्हणून लोणार सरोवराला आगळे वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे.**

संभाजीनगरमधील भटका तांडा या ग्रुपचे अध्यक्ष श्रीकांत उमरीकर यांनी आयोजित केलेल्या स्पेशल बसनी आम्ही सारेजण लोणार सरोवर सहलीसाठी निघालो... सहल संयोजक आकाश ढुमणे यांनीही या सहलीसाठी विशेष परिश्रम घेतलेले होते. आमच्या भटका तांडा समुहाचे अध्यक्ष श्रीकांत उमरीकर हे प्राचिन मंदिरे.. शिल्पकला..देवदेवता.. भारतीय इतिहास.. भारतीय संस्कृतीचे गाढे अभ्यासक आहेत. तसेच ते मराठवाड्यातील एक कवी लेखक नि शेतकरी संघटनेचे मोठें नेतेही आहेत. याचा आम्हा सगळ्यांना नेहमीच मोठा अभिमान वाटतो हे बाकी खरं... त्यामुळे गेल्या दोन वर्षांपासून आमच्या भटका तांडा या पर्यटनाच्या रसिकप्रेमींमध्ये श्रीकांत उमरीकरांचे वेगळे स्थान निर्माण झालेले आहे हेच खरं...

लोणार सरोवराच्या निसर्गसहलीसाठी संभाजीनगरपासून आम्ही सारेजण स्पेशल बसनी निघालो. बसमध्येच मौज मस्ती मजा गाण्याच्या भेंड्याची रंगत वाढत गेली. सकाळी १० वाजता आमची बसं ही दिलीप राठोड यांच्या सुरज हॉटेल मध्ये आली. त्याठिकाणी आमचे गाईड रमेश राठोड यांचा परिचय करून दिला गेला.

गरमागरम पोहे उपमा यांचा मनसोक्तपणे आस्वाद सगळ्यांनीच घेतला. नंतर आमची बसं लोणार सरोवराच्या ठिकाणी येऊन थांबली. रमेश राठोड यांनी संपूर्ण सरोवराची... लोणारच्या सरोवराच्या काठावर असणाऱ्या प्रत्येक मंदिराची खूप खूप सुंदर माहिती दिली... सगळी मंदिरे पहात पहात... दुपारचे तीन वाजून गेले होते. पुन्हा हॉटेल सुरजमध्ये पोहोचलो. अतिशय स्वादिष्ट जेवणांवर साऱ्यांनीच नुसता आडवा हात मारला.

पुन्हा लोणार गावातील झोपलेल्या हनुमानाचे... तसचे अलौकिक शिल्पकलेचा नमुना असणारे विष्णूचे मंदिर पाहिले. आमचे जीवनच कृतार्थ झाल्याचे आम्हाला वाटले... सकाळपासूनच्या धावपळीत सारेजण पार थकून गेलेले होते. रात्री जवळजवळ आठ वाजता आम्ही सारेजण संभाजीनगर मध्ये परतलो.

लोणारच्या अलौकिक सफरीच्या सुंदर सुखद आठवणींची शिदोरी घेऊनच... लोणार सरोवराच्या तिरावरुन आपल्या रसिक वाचकांसाठी लोणार सरोवराची संपूर्ण माहिती पुढे दिलेली आहे.

संभाजीनगर पासून साधारणता १४० किलोमीटर अंतरावर बुलढाणा जिल्ह्यात लोणार सरोवर आहे. आज जागतिक ठेवा म्हणून जगाच्या नकाशावर लोणारचं नाव देशविदेशातील पर्यटकांना देखील माहित झालेलं आहे. भारताचा प्राचीन इतिहास आपण जर पाहिला तर दंडकारण्याचा भाग म्हणून विदर्भाच्या या भूमीचा उल्लेख आपणास आढळतो. जगाच्या इतिहासामध्ये जी मोठी खगोलशास्त्रीय घटना घडली त्यामधून लोणारच्या सरोवराची निर्मिती झाली असे संदर्भ आपणास वाचाव्यास मिळतात. लोणार सरोवर हे जगातील तिसऱ्या क्रमांकाचे विवर आहे. या सरोवराचा अंदाजे साडेसहा किलोमीटरचा आहे. जगामधील बेसॉल्ट खडकापासून तयार



झालेले हे एकमेव सर्व म्हणून लोणार सरोवराला आगळे वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे.

लोणार सरोवरावर अनेक संशोधकांनी जी संशोधने केली त्यावरून लोणार सरोवर सत्तर हजार वर्षे जुने असावे असे संदर्भ आढळतात .रामायण महाभारताच्या पूर्वी हे सर्व होते असे ऐतिहासिक पौराणिक संदर्भात वाचाव्यास मिळतात. लोणार सरोवराच्या सभोवताली काठावर दहाव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत जवळपास २७ मंदिरे त्या ठिकाणी बांधली गेलेली आहेत. यामध्ये विशेष उल्लेख करावयाचा झाल्यास महादेव मंदिर.. राम मंदिर.. देवीचे मंदिर.. सूर्य मंदिर.. कृष्ण मंदिर.. अशा मंदिरांचा विशेष उल्लेख करावा लागेल. त्याचबरोबर या ठिकाणी अनेक इतर देवदेवतांची मंदिरे देखील होती ती मात्र नामशेष झालेली आहेत असे आपणास दिसते.

पौराणिक आख्यायिकेचा जर आधार घेतला तर भगवान विष्णू यांनी लमणासूर या राक्षसाचा वध केल्याने हे विवर तयार झालेले आहे म्हणून या परिसराला लोणार असे नाव पडलेले असावे असे संदर्भ आपणास पुराणात सापडतात. तर काहींच्या मते लवण म्हणजे मीठ आणि या सरोवरात मिठाचे प्रमाण जास्त असल्यामुळे या सरोवलाला लोणार चे नाव दिले गेले असावे असाही उल्लेख आपणास वाचावयास मिळतो. हैदराबादच्या निजामाने त्या काळामध्ये या सरोवरातून भरपूर मीठ काढले असाही उल्लेख ग्रंथामधून आपणास वाचाव्यास मिळतो...

असे असले तरी लोणार सरोवर हे वैज्ञानिक व खगोलशास्त्रीय घटनेमुळे तयार झालेले आहे असे निश्चितपणे सांगितले जाते. लोणार सरोवर हे २००६ साली संपूर्णपणे आटलेले होते. त्या ठिकाणी सरोवरामध्ये मिठासारखे स्पटिक साऱ्यांना दिसले. अनेक रंगांच्या चमकणाऱ्या दगडांचा देखील या स्पटिकांमध्ये समावेश होता. या सरोवरामधून अनेक स्पटिकांचा आणि चमकणाऱ्या दगडांचा लोकांनी त्यांच्या संग्रहात समावेश केलेला आहे असेही सांगितले जाते .त्यानंतर पुन्हा खूप पाऊस झाल्यामुळे हे सरोवर पूर्णपणे भरण्याची माहिती देखील स्थानिक लोक सांगतात. अमेरिकन संशोधन संस्था जिओग्रिकल सर्वे या संस्थेने लोणार सरोवराबद्दल अनेक वर्षे संशोधन करून खूप मोठ्या प्रबंध भारतीय शासनाकडे सुपूर्त केलेला आहे.

लोणार सरोवराच्या सभोवताली घनदाट असे अरण्य आहेत आणि या आरण्यामध्ये अनेक औषधी वनस्पतींचा.. झाडांचा वृक्षांचा समावेश आहे .एक विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे या जंगलामध्ये शाकाहारी घुबड आढळतात. त्याचबरोबर या जंगलामध्ये अनेक पशुपक्षी प्राणी यांचा निवास असल्याचे सांगितले जाते. विशेषता डिसेंबर महिन्यामध्ये ब्राह्मणीला चार्वाक पक्षी स्थलांतर करून नियमितपणे या ठिकाणी येत असतात. त्यामुळे पक्षीप्रेमी पक्षी अभ्यासक त्यावेळेस सरोवराच्या ठिकाणी गर्दी करताना दिसतात.

महाराष्ट्रातील सात आश्चर्यामध्ये लोणार सरोवराचा समावेश केलेला आपणास दिसतो. महाराष्ट्रातील ऐतिहासिक आणि देखण्या साथ आश्चर्याची नोंद २०१३ साली घेण्यात आली. त्यामध्ये घोषणा करण्यात आली त्यात ग्लोबल पॅगोडा ..सीएसटी स्टेशन ..दौलताबादचा किल्ला.. कास पठार.. रायगडचा किल्ला ..लोणार सरोवर ..अजिंठा लेणी.. ही महाराष्ट्राची सात आश्चर्य ठरवली गेलेली आहेत. १९७० साली नील आर्मस्ट्रॉंग चंद्रावर त्यांनी पहिले पाऊल टाकलेले होते. त्यावेळेस त्यांनी चंद्रावरून पृथ्वीचे जे फोटो काढले त्या ठिकाणी त्या फोटोमध्ये अमेरिकेतील नासा वैज्ञानिक अभ्यास करणाऱ्या अंतराळ संशोधक संस्थाने त्याला मान्यता दिलेली होती .नासाने चंद्रावरील लुना-२ या यानांनी लोणारच्या विवराची तुलना केली . त्यावेळी चंद्रावर असणारे विवर सरोवर नी लोणार सरोवर या दोन्ही विवरामध्ये बरेच साम्य आहे असे त्यांनी त्यावेळेस नमूद करून ठेवले. त्यामुळे १९७० सालापासून जगासमोर लोणार सरोवराला खूप मोठी प्रसिद्धी मिळाली तसेच मान्यता देखील मिळाली. लोणार परिसराच्या मातीत मोठ्या संख्येने लोहखनिज आढळतात. वाळूचा काच बनवण्यासाठी जो उपयोग केला जातो अशी माती या ठिकाणी आहे. लोणार सरोवरातील परिसरातील दगड हे सचिद्र आहेत विशेषतः हे दगड पाण्यावर टाकले असता तरंगतात .या ठिकाणी असणारे दगड हे चुंबकीय दगड परग्रवर आढळणारे सिलिका ऑक्साईड सारखे स्फटिक या दगडामध्ये आढळतात .लोणारच्या सरोवरात असलेल्या शेवाळ्यामुळे येथील पाणी हिरव्या रंगाचे झालेले दिसते. या पाण्यामध्ये फ्लोराईड कॉपर आणि आयर्न या धातूचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणावर आढळते .हे शेवाळ खाण्यासाठीच अनेक पक्षी या ठिकाणी गर्दी करताना आपणास दिसतात.

रामायणाच्या ग्रंथाच्यामध्ये पंचाश्वर नावांनी या सरोवराचा उल्लेख आढळतो. महाभारतामध्ये पद्मतीर्थ या नावाने लोणार याचा सरोवराचा उल्लेख आढळतो .तर महानुभाव पंथाच्या लीळाचरित्रात तारातीर्थ म्हणून या सरोवराचा उल्लेख आढळतो. याचबरोबर ऋग्वेद.. स्कंदपुराणातील ग्रंथात देखील आपणास लोणार सरोवराचा उल्लेख आढळतो. या परिसरात असलेले मंदिर दैत्यसुदन मंदिराची स्थापत्य ही खजुराच्या मंदिराच्या स्थापत्याशी जुळते मिळते असल्याचे जाणवते. लोणार सरोवराचा जंगलाचा अभ्यास करून ते अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. लोणार सरोवराच्या परिसरात सत्तरहून अधिक जातींचे पक्षी. अनेक जंगली प्राणी यांचा मुक्त संचार आपणास दिसतात. जैवविविधतेचनी परिपूर्ण असणारे हे अभयारण्य असल्यामुळे सरोवराच्या संवर्धनासाठी आणि जंगलाच्या जतन करण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि पुरातत्त्व विभाग यांनी मोठ्या प्रमाणावर परिश्रम घेतल्याचे आपणास दिसते.

अशा या अलौकिक लोणार सरोवराच्या ठिकाणी विविध भागातून पर्यटक सातत्याने येत असतात. संभाजीनगर पासून केवळ १४० किलोमीटर अंतरावर लोणार सरोवर आहे. मुंबई नागपूर या रेल्वे मार्गावर मलकापूर स्थानकावर आपण आला तर तिथून लोणार सरोवर जवळच , जर आला तर परभणी परतुर जाल.

ना येथून देखील लोणार ला येण्यासाठी रेल्वेची सुविधा प्राप्त आहे .आपण जर रस्त्याच्या मार्गाने जर लोणारकडे यावयाचे झाले तर मुंबई , नागपूर , मलकापूर औरंगाबाद अजिंठा जालना बुलढाणा जळगाव या ठिकाणाहून देखील व्यवस्था वाहनांची व्यवस्था उपलब्ध असते लोणार सरोवराच्या जवळच अडीच किलोमीटर अंतरावर महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाची निवासस्थाने रिसॉर्ट उपलब्ध असतात त्याचबरोबर लोणार सरोवराच्या परिसरात अनेक खाजगी हॉटेल्स आणि लॉजिंगची राहण्याची उत्तम व्यवस्था असते.

# ।। तुझे आहे तुजपाशी ।।

आधुनिक केसरी

**आपले दुःख जसे कुणावर अवलंबून असू नये तसेच आपले सुख हे ही कुणासाठी थांबणारे नसावे. आपला आनंद सर्वस्वी स्वतः च्या हाती आसावा म्हणजे तो क्षणभंगुर वाटणार नाही, तर चिरःकाल टिकेल व आपण तोच आनंद पुन्हा पुन्हा मिळवूही शकू. कारण तो आपल्याच हाती असेन. एवढा संघर्षमय प्रवास करुन स्री ने स्वतः चे अस्तित्व निर्माण केलेले आहे तर, ते कुणासाठी किंवा कुणाच्या कसल्याहि त्रासाने संपविण्याइतके क्षुल्लक आहे का? प्रत्येक कठीण प्रसंग, अनुभव हा स्वतः ला भक्कम बनविणारी पायरी समजून पुढे मार्गक्रमण करत रहाणं जमायलाच हवय. त्रास देणाऱ्या गोष्टीच फक्त आयुष्यात आहे अस समजून जीवन संपवणे हे चुकीचे आहे.आनंददायी गोष्टी आपल्या आपणच शोधायला ही हव्यात.**

मधुरा जरा सर्दीने परेशान होती. म्हणून विश्रांती घेत पडली. तिला वाटले एवढे राबते ती घरासाठी, तर नवरा व मुले यांना त्याची जाणीव असेनच, आपली अवस्था बघुन ते न सांगता ही सगळी कामे सांभाळून घेतील. परंतु झाले भलतेच, एक दिवस कशीबशी मदत करत, नवरोबानेही अंथरुन धरले, थकवा आलाय म्हणत नवरा व मुलांनी हळूच अंग काढून घेतलं. संतापाने मधुराला खूप राग आला. तसेच दुखणे अंगावर काढत तिने पुन्हा कामाला कंबर कसली. बडबडली, संतापली तेव्हा कुठे घरातील कामासाठी हलू लागले. परंतु दरवेळी बोलण्याची वेळ येत असेन तर नक्कीच मधुराने यावर उपाय शोधावा. त्रागा न करता जमेल झेपेल तितके करुन, स्वतःस शांत ठेवण्याचा सर्वात आधी प्रयत्न करावा. घरातील सर्वांना रोजच कामाची सवय लावावी.

वेणूच्या ऑफिसमधील वरीष्ठ स्वतः कामचुकार, परंतु कर्मचाऱ्यांना नियमांचे बंधन घालून सतत त्रास देणारे, शिवाय समोर आलेल्या प्रत्येकाजवळ दुसऱ्याची चुगली करणाऱ्या वरिष्ठांच्या वागण्याचा वेणूला प्रचंड संताप येत असे. सगळं मार्गी, प्रामाणिक वेणूने विरोध दर्षविल्यामुळे तिला इतररांसमोर अपमानीत करणे, कामात चुका काढणे अशा प्रकारे तिचा मानसिक छळ सुरु झाला. सतत त्याच विचारात गुरफटल्याने वेणूची घरीदारि चिडचिड होऊ लागली. आपल्याच बाबतीत असे का होते म्हणत ती स्वतःला दोषी ठरवू लागली. इतकी की स्वतःचा आत्मविश्वास गमावातेय की काय असे तिला वाटून गेले.

आयुष्य हे असेच अनेक चढउतारांनी भरलेल आहे. जसे चांगले दिवस थांबत नाहित, तसेच वाईट दिवसही जाणारेच असतात. चांगला वाईट प्रत्येक प्रसंग नक्कीच काहीतरी शिकवून जात असतो. फक्त त्याकडे सकारात्मकतेने बघण्याची दृष्टी आपण जाणीवपूर्वक कमवायला हवी.

स्री ही पूर्वापार अन्यायग्रस्त म्हणून जगत होती. परंतु स्वतः तील चांगले वाईट गुण दोष ओळखून जबाबदारी पेलत ती समाजात स्वतः चे स्थान निर्माण करत गेली. तेव्हा समाजातील सर्वच प्रवृत्तींना आळोखेपिळोखे देत किंवा कपाळावरील आठ्या सांभाळत स्रीला स्विकारावेच लागले. किती आणि कुठे कुठे विरोध करणार होते. विरोधातही चांगल्या प्रवृत्ती खंबीरपणे स्रियांच्या पाठीशी उभ्या राहू लागल्याच की!

अगदी जन्म घेण्यापासून स्री भ्रूणाचा हा संघर्षमय प्रवास आज सर्वांसाठी प्रेरणादायी ठरताना दिसतोय. अनेक नकोशा झालेल्या याच पणत्यांनी तिव्र विरोध सोसत, आपल्या चांगुलपणाच्या प्रकाशाने समाजाचे डोळे दिपवून टाकलेले आहेत.

आज प्रत्येक स्री स्वतः कडे आवर्जून लक्ष देवू पहातेय. तिचे दिसणे, तिचे असणे, तिचे काम, जबाबदारी, कामाचे कौतुक या सर्वांमधे तिच्या आवडीचा ती प्रकर्षानै समावेश करत आहे.जुन्या मित्र मैत्रिणींच्या घोळक्यात आवडेल त्या पोशाखात ती लिलया वावरताना दिसते. कोण काय म्हणेल? मी कशी दिसेल? या गोष्टी सहज नजरेआड करण खरचं तिला जमूही लागलय. दिवासभरातील काही तास काही क्षण आवर्जून स्वतः ला देवू पहातेय. मग ते चहा पित निवांत पेपर वाचणे असो, बगीचातील झाडांजवळ शांत बसून रहाणं असो, टीव्हीवरील एखादा आवडता शो रिमोट हातात घेऊन बघणं असो, की निवांत झोपाळ्यावर वाचत बसणं असो. खिडकीत बसून स्वतः शीच गप्पा करणं असो की समाजमाध्यमावर स्वतःला व्यक्त करणं असो, अशा अनेक गोष्टी, छंद जोपासण्यातही स्री पारंगत होताना दिसतेय.

तरीही काहीतरी खटकतय! काय? कुटुंबासाठी दिवसभर राबणारे शरीर जेव्हा खूप थकून जाते, तेव्हा घरच्यांनी न सांगता आपला त्रास ओळखावा, आपल्याला खूष करावे, कुणीतरी सतत आपल्याशी गोड बोलावं, आपलं व आपल्या कामाचं कौतुक करावं, सतत आपल्याला प्रोत्साहन देण्यासाठी कुणीतरी आपल्यासाठी झटावे, अशी अपेक्षा केली जाते. ती पूर्ण न झाल्यास खट्टू होऊन स्वतःलाच दोष दैत बसणे सुरु होते.

मनिषा चौधरी
नाशिक, मो. 9359960429

कौतुकाची थाप, फक्त लढ म्हण हे सर्वच प्रेरणादायी असले तरीही या बाह्यप्रेरणेवर जर आपले मुड्स अवलंबून असतीन तर कसा टिकेल आपला उत्साह? यासाठी काही गोष्टींकडे आवर्जून लक्ष देवूयात.

1 )कुटुंब असो की कार्यक्षेत्र , मानसिक त्रास हा होणारचं, त्याकडे खंबीरपणे बघून त्यातुन मार्ग काढण्याइतपत सक्षम व्हायलाच हवे.

2 )प्रत्येक कठीण प्रसंगात, पूर्विच्या समस्या व त्यावर आपणच शोधलेले उपाय यांचे स्मरण करावे.

3 )कुटुंबिय, मित्र मैत्रीण यांच्याजवळ मन मोकळे करावे.

4 )काही काळासाठी वादग्रस्त व्यक्ती वा ठिकाणापासून दूर जावे.

5 )शांतपणे विचार करण्याची सवय रुजवावी.

6 )काहीहि झाले तरी आपला आनंद व दुःख यांची चावी आपल्याच हाती असावी.

7 )स्वतः चे प्रेरणास्थान सर्वप्रथम आपणच असावे.

8 )स्वतः विषयी , स्वतः च्या अस्तित्वाविषयी आदर बाळगावा.

9 )आत्महत्या, आत्मक्लेष, स्वतःला दोष देणे या गोष्टींना कधीच मनात , विचारात स्थान देवू नये.

10 )कुणाही साठी संपविण्याइतपत सहज सोपा मिळाला आहे का हा जन्म? याचा नक्कीच विचार करावा.

11 )हे हि दिवस जातील, ज्यावर तोडगा नाहि अशी कुठलीच समस्या असूच शकत नाही हे स्वतः वर बिंबवावे.

12 )अपमान मनहानीचे प्रसंग आल्यास स्वतः ला शांत ठेवून तो काळ उलटून जाण्याची वाट बघणे जमायला च हवे.

13 )कुठल्याही संकटाला आत्महत्या हा पर्याय कधीच असू शकत नाही हे प्रथम स्वतः ला बजावावे, आणि मुलांवरहि तसेच संस्कार करावे.

14 )नेहमी सकारात्मक दृष्टिकोन बाळगून , सकारात्मक विचारांची सवय लावून घ्यावी.

15 ) लहान सहान गोष्टी तील आनंद टिपून ठेवावा.

16 )भूतकाळातील कुठल्याही वाईट प्रसंगास कुरवाळत बसू नये.

17 )आनंदी आठवणींचा ठेवा जपण्याची सवय रुजवावी.

लक्षात ठेवा, आपल्याच हाती ठेवा आपल्या आनंदाची दोरी, तरच निभाव लागेल नारी, तुझा घरोघरी.

## दु:ख मनातले

कस सांगू देवा दुःख माझ्या मनीचे
रक्षण करण्या गेलास रणभुमीचे
हळद अंगाची होती अजुनही ओली
अन् डोळ्यातच राहिले स्वप्न संसाराचे....

वाट पाहत होती तुझी कितीदा
येशील परतून कधीतरी
वाटेकडे तुझ्या डोळे लागती
परी दिसे रस्ता मोकळाच तरी...

सय येता तुझी किती
हुंदका ह्रदयात दाबुनी ठेवती
डोळ्यात आसवांची गर्दी होती
पून्हा पून्हा नजर तुझ्या वाटेकडे
लागती.....

पहाते शुर सैनिकाच्या या आईस
विनम्र अभिवादन करावे वाटते
पापण्यांच्या आड लपवून आसू
चेहऱ्यावर खोटे हसू आणते...

एकुलता एक सीमेवरती लढतोय
म्हातार पणाची तो काठी असतो
तरी अभिमान असे माऊलीला
भारतासाठी शत्रुशी लढत असतो...

सलाम त्या माऊली अन् पत्नीला
ज्यांनी काळजावर दगड ठेवला
शिक्षण देवून आर्मीत घातला
देशसेवेचा वसा त्यांनी घेतला...

-सीमा मंगरूळे तवटे,
वडूज सातारा

## झडीचा-पाऊस...!



सूर्य लपला ढगामागे
रिमझिम पाऊस पडे,
हिरव्या सृष्टीला पाहून
मन आनंदी झाले गडे.

हिरव्या वनराईवर
झडीचा पाऊस हा रंगे,
अवखळ गार वाऱ्याने
चोहीकडे आभाळ पांगे.

पतझडीच्या पावसाने
वृक्ष-फांदयांची गळे मान,
पिके आनंदात डोलती
हिरवेगार दिसे रान.

तलाव-धरणे भरली
नदी झुळझुळ वाहती,
साचलेल्या संथ पाण्यात
पक्षी प्रतिबिंब पाहती.

झडीचा पाऊस पडता
केव्हाचीच झालीया सांज,
देवळात भक्त वाजवी
मधूर घंटा आणि झांज...!

- अय्युब पठाण लोहगावंकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## कृतज्ञता

कृतज्ञता असावी
सर्वांच्या मनी
उपकाराची जाणीव
असावी ध्यानी

गरजवंतांना द्या
मदतीचा हात
होईल त्याची मग
संकटावर मात

एकदुसऱ्याला सदा
बोलावे सत्य
सलोखा नि प्रेम
असावे नित्य

दुसऱ्यांच्या वैभवाचा
करू नये हेवा
सदा अंगी बाळगावा
संस्काराचा ठेवा

मनातली कृतघ्नता
दूर आता सारा
मानवता धर्म पाळूनी
कृतज्ञतेला द्या थारा

-रविंद्र व्ही. चालीकवार
महागाव, जि. यवतमाळ,
मो. 9011559106



## मरण दे रं देवा

बास झालं जगणं देवा
येऊ दे आता मरण
जीव जळतोया जित्यापणी
पेटू दे एकदाचं सरण

समदं जिन खर्ची झालं
करून थकलो चाकरी
म्हातारपणी पोटाला द्या
मिळना चतकोर भाकरी

पाखरं म्हये हारपले रं
शहरामंदी जाऊन
धुरकट झाली नजर आता
वाट त्यांची पाहून

शिकून सवरून पोरं म्हये
लईच हुशार झाले
फाटक्या-मळक्या बापाला या
लवकर इसरून गेले

स्वाभिमान जित्ता हाय
मागू तरी कशी भिक
चार पैशेबी न्हाईत जवळ
नाय तर खाल्लं असतं ईख

नशिबाचा भोग म्हंया
सांग ना सरल कवा
लाचारीच्या ह्या जिन्यापरीस
मरण दे रं देवा


-ऋषिकेश बालासाहेब सुरवसे
रा.छ.संभाजी नगर सोनपेठ
संपर्क : ८४११९४७९९६.

## मैत्री

परिचयातून जुळते ती मैत्री...
विश्वासाने जपते ती मैत्री....
सुखात साथ मागते ती मैत्री...
आणि दुःखात साथ देते ती मैत्री..
चुकांवर रागावते ती मैत्री..
पापण्यांतील अश्रुंना सांठवते ती मैत्री...,
डोळ्यांतील भाव ओळखते ती मैत्री...,
आणि
एकमेकांचा मान ठेवते ती मैत्री..

- अवि कुलकर्णी






## ह्रदयातलं प्रेम

मैत्रीच्या धाग्याला घट्ट विणावे
अंतरमन दुखले जरी
दोघांच्या डोळ्यात
पाणी टचकन यावे

हसत, खेळत पुढील आयुष्य
आनंदाने जगावे
दिसत नसले मैत्रीचे प्रेम तरी
ह्रदयात याला जपून ठेवावे

खूप सुंदर मैत्रीत्वाचं
हे प्रेम असतं
या पेक्षा त्या पलीकडे
दुसरं कांहीच नसतं

भावना ओथंबून वाहतात
तुला बोलण्यासाठी
तुच असावा मित्रा फक्त
सदैव माझ्यासाठी

इकडे, तिकडे कुठेही
नकोस तू पाहू
मनाला या तू जतन कर
दोघे आपण तिथंच राहु

-सौ. भाग्यश्री दायमा



## मृगधारा

सरीवर सरी आल्या
पावसाच्या सरी
वाऱ्यासंगे वाहे सुगंध
मातीचा कस्तुरी

थेंब नाचती थुई थुई
भिजली सारी भुई
भोऱ्या पाण्याचे पाट
खळखळती रस्त्यावरी

घन छेडती घनाला
घुमे मेघमल्हारी
मन मोरासंगे नाचे वीज
ढगाच्या ढोलावरी

स्वप्न सुखाचे डोळ्यात
फुलेल हिरव्या शिवारी
लक्ष्मीच्या रूपात येतील
धान्याच्या राशी घरी....

-सुनील माथने, अकोला
संपर्क क्र. 9403282970

## फेरफटका

वाटले आज
मारावा फेरफटका मनाला
जावे तळाला
अजमावे...

मनाचा कोपरा
ठेवावा एखादा कोरा
बांधून दोरा
ठेवावा...

चांगले विचार
किती असतात मनात
मोजून डोक्यात
पहावे....

वाईट विचार
सारेच काढून टाकू
कचरा फेकू
वाईटाचा....

मनाच्या तळाशी
खुप काही साचलेय
मांडून बसलेय
विचार...

करूया प्रयत्न
चांगले कर्म करण्याचा
कल मनाचा
घेऊया...

सीमा मंगरूळे, तवटे वडूज सातारा

## ऐक हृदयाचे इशारे

दाटूनी आभाळ येता झिंगुनी आलेत वारे
फुंकुनी कानी म्हणाले एवढा भ्यालास का रे?

भ्यायचे कोणी कशाला हा क्षणाचा खेळ आहे
ह्या ढगाच्या आड लपले चांदणे आहेत तारे

चंद्रही आहे नभी सूर्य उगवे नित्यनेमे
कंटकाच्या आड नाचे हे गुलाबाचे फवारे



-डॉ विजय पांढरीपांडे
संपर्क क्र. 7659084555

पावले थांबू नका धाव घ्या रांगू नका
एरवी मागे तुला सोडूनी जातील सारे

मार्ग काही दाट गर्दीचे तिथे जाऊ नका
वाट एकाकी सुखाची आपल्या तालात गा रे

गुंतणे मोहात कुठल्या फार नसते चांगले
कोरडे कोरे रहावे ऐक ह्रदयाचे इशारे..

## शेतकरी बाप

दिवस रात्र राबतो ।
करतो कष्ट हा अमाप ।।
तरीही कर्जात बुडलाय ।
कारण सरकारच हे पाप ।।
दुष्काळ, गारपिट मुळे ।
शेतकरी रचतोय स्वतःच सरण ।।
पण खिसा व्यापाऱ्यांचा मात्र ।
राहतो नेहमीच गरम ।।
करतोय कष्ट अमाप ।
कधी नं दमला, थकला ।।
स्वतःच मालक स्वतःचा ।
नाही कुणापुढे वाकला ।।
दिली जर त्याला कधी ।
त्या निसर्गाने साथ ।।
काळ्या मातीतून पीकवीन ।
तो सोन्याचा घास ।।



-किरण थोरात, वाळकी दौंड जिल्हा

# भारताच्या राष्ट्रपती : श्रीमती द्रौपदी मूर्मू



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**स्वतंत्र भारताच्या 15 व्या आणि पहील्या आदिवासी महिला,महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मूर्मू यांचे मन:पूर्वक अभिनंदन. भारतीय लोकशाहीत प्रथमच दृष्ट्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रत्नपारखी नजरेने हेरून एक खंबीर रत्न सर्वोच्च पदासाठी निवडले. श्रीमती द्रौपदी मूर्मू यांच्या खाजगी जीवनात काय काय आघात त्यांना सहन करावे लागले हा त्यांचा वैयक्तीक प्रश्न आहे. पण त्या घडलेल्या आघातांमुळे द्रौपदी मूर्मू या खंबीर, दृढनिश्चयी, सहनशील, संयमी आणि जिद्दी जीवन जगायचे शिकल्या. शालेय जीवनात वर्गाच्या मॉनिटर राहिलेल्या द्रौपदी मूर्मू यांनी शालेय, महाविद्यालयीन शिक्षण अतिशय कठीण परिस्थितीत पूर्ण केले. मग कुटूंबाची, संसाराची गरज म्हणून शिक्षिका म्हणून काम करायला सुरूवात केली, या नोकरीच्या कालखंडात शिक्षणाचा दर्जा उच्च ठेवण्याचा सतत प्रामाणिक प्रयत्न केला. नंतर त्यांनी क्लार्क म्हणून ही तीन चार वर्षे नोकरी केली. आणि संधी मिळताच आपल्या मनातील बदल घडवण्याचे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेऊन राजकारणात प्रवेश केला.**

त्या आमदार म्हणून विजयी झाल्या आणि नविन पटनायक यांच्या बिजू जनता दल आणि भाजपाच्या युती सरकारमध्ये मंत्रीही झाल्या. नंतर त्या झारखंडच्या राज्यपालही झाल्या. अतिशय विनयशील स्वभाव, तरीही आपल्या मतांवर आणि आग्रही म्हणन्या वर ठाम राहणाऱ्या द्रौपदी मूर्मू यांनी राज्यपाल म्हणून उत्तम काम केले. तळागाळातल्या लोकांशी सतत संपर्क, आदिवासी समाजाचे प्रश्न, अडचणी, गरजा यांची जाणीव असलेल्या मूर्मूजी यांनी मार्गदर्शक काम केले. आणि आता त्या चक्क सर्वोच्च पदावर दिमाखात विराजमान झाल्या आहेत.

भाजपच्या सर्व वरिष्ठ आजी माजी श्रेष्ठींशी असलेले दृढ आणि विश्वासाचे, ममतेचे संबंध कायम ठेवत असतानाच ओरिसा या आपल्या राज्याचे दिर्घकाळ मुख्यमंत्री पद भूषवत असलेल्या नविन पटनायक यांचेशी बंधूभगिनी चे नाते प्रेमाने मायेने जोपासत आहेत. दरवर्षी राखी पौर्णिमा दिनी त्या या भावाला राखी बांधून सख्ख्य जपत आहेत. भारतभर पसरलेला आदिवासी समाज आज प्रचंड आनंदी, उत्साही आहे. त्यांनी ठिकठिकाणी जोरदार उत्सव साजरा केला आहे. पुण्याच्या प्रकाश पायगुडे यांच्या आदिवासी शाळेतील चाळीस मुलींनी तर महामहीम राष्ट्रपती मोहदया श्रीमती द्रौपदी मूर्मू यांना पुणे भेटीचे आग्रही निमंत्रण देखील दिले आहे.

भाजपाचा, प्रमुख पक्ष नेतृत्वाचा आणि विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विश्वास सार्थ ठरवत अतिशय उत्तम आणि क्रियाशील राष्ट्रपती म्हणून त्या नांव कमावतीलच. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने श्रीमती द्रौपदी मूर्मू यांचे नावाला संमती देऊन त्यांच्यावरील भाजपाच्या विश्वासाला पाठिंबा देऊन, श्रीमती द्रौपदी मूर्मू यांची जबाबदारी वाढवली आहे.

अंत्योदय योजना आणि सरकारची गरीबांसाठी उत्थान योजना राबवण्याची तळमळ, श्रीमती द्रौपदी मूर्मू यांच्या करड्या देखरखी खाली आता सुलभपणे आणि प्रभावी पणे कार्यान्वित होईल. महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मूर्मू यांची कारकीर्द यशस्वी, विशेष उल्लेखनीय, आणि आदर्श ठरेल हा विश्वास व्यक्त करून त्यांना कोटी कोटी शुभेच्छा देतो. तसे श्रीमती द्रौपदी मूर्मू यांनी जवळपास 64% टक्के मते मिळवत हा विजय मिळवला आहे. त्यांनी भाजपच्याच माजी मंत्र्याचा पराभव केला आहे. यशवंत सिन्हा यांना 36% मते मिळाली ती त्यांच्याबद्दल अपूलकी, स्नेह, विश्वास आहे म्हणून नव्हे तर मोदींना प्रखर विरोध करणाऱ्या विरोधी पक्षांच्या अंध विरोधी धोरणाचा तो परिपाक आहे.

तरीही जवळपास 208 मतदारांनी यशवंत सिन्हा यांना आपले मत दिले नाही. पक्ष धोरणा विरोधात जाऊन श्रीमती द्रौपदी मूर्मू यांना मतदान केले. त्याचप्रमाणे कांही घाबरट मतदार आमदार खासदारांनी ईच्छा असूनही आपापल्या पक्ष श्रेष्ठीना घाबरून आपली मते बाद केली. असे जवळपास 15/16 मतदार आहेत. विक्रमी मतांनी विजय मिळवून श्रीमती द्रौपदी मूर्मू यांनी आदर्श प्रस्थापित केला आहे.



# भ्रूणहत्या आणि विघातक गोष्टींवर प्रहार : आमची गझलसाद



प्रकाश क्षीरसागर
संपर्क क्र. ९०११०८२२९९

आधुनिक केसरी

**स्वतंत्र भारताच्या 15 व्या आणि पहील्या आदिवासी महिला,महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मूर्मू यांचे मन:पूर्वक अभिनंदन. भारतीय लोकशाहीत प्रथमच दृष्ट्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रत्नपारखी नजरेने हेरून एक खंबीर रत्न सर्वोच्च पदासाठी निवडले. श्रीमती द्रौपदी मूर्मू यांच्या खाजगी जीवनात काय काय आघात त्यांना सहन करावे लागले हा त्यांचा वैयक्तीक प्रश्न आहे. पण त्या घडलेल्या आघातांमुळे द्रौपदी मूर्मू या खंबीर, दृढनिश्चयी, सहनशील, संयमी आणि जिद्दी जीवन जगायचे शिकल्या. शालेय जीवनात वर्गाच्या मॉनिटर राहिलेल्या द्रौपदी मूर्मू यांनी शालेय, महाविद्यालयीन शिक्षण अतिशय कठीण परिस्थितीत पूर्ण केले. मग कुटूंबाची, संसाराची गरज म्हणून शिक्षिका म्हणून काम करायला सुरूवात केली, या नोकरीच्या कालखंडात शिक्षणाचा दर्जा उच्च ठेवण्याचा सतत प्रामाणिक प्रयत्न केला. नंतर त्यांनी क्लार्क म्हणून ही तीन चार वर्षे नोकरी केली. आणि संधी मिळताच आपल्या मनातील बदल घडवण्याचे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेऊन राजकारणात प्रवेश केला.**


आमची गझलसाद हा बारा गझलकारांचा गझलसंग्रह. प्रत्येक गझलकारच्या दहा- बारा गझल यात आहेत. विविध गझलकारांनी आपल्या भावभावनांना यातून मनमोकळेपणे वर्णन केले आहे. कोल्हापूर येथील नरहर रामचंद्र कुलकर्णी यांचे संपादन आहे. बारा गझलकारांच्या उत्कृष्ट गझल निवडून त्यांचे संपादन करण्याचे जिकिरीचे काम त्यांनी चिकित्सक पद्धतीने केले आहे. गझलकाराचा फोटोसह परिचय, संपर्क क्रमांक आदी तपशीलासह दिला आहे, हे विशेष. डॉ. दयानंद काळे यांची 'मनासारखी' ही गझल विचारप्रवण करते. आपल्या सखीचे स्वभाव वर्णन खुमासदार रीतीने यात केले आहे. 'विठ्ठला', 'विकास,' 'कुणाच्यातलं' 'मागणी' या गझल छान आहेत. 'भास' ही गझल नव्या जुन्याची तुलना करते.

'निजायला उशी कुठली नभाला चांदणे होते विखारी फॅनचे वारे कुशीला जाचते आता' हा शेर जुन्या जमाना आठवायला लावतो. आकाश मंडप पृथ्वी आसन या तुकोबांच्या उक्तीची याद करून देतो. त्यांच्या इतर गझलही विचारप्रवण करतात. दिलीप कुलकर्णी यांची 'कळेना' विचारप्रवण करते. करावे जिने भस्म भ्रष्टासुराला घडी तीच का लाच खाते कळेना असे ते या गझलेत म्हणतात. 'विदूषकी' ही गझल बारकाईने वाचून तीवर चिंतन करण्याजोगी आहे. केला महान ज्यांनी विश्वास आखणीने त्या स्वस्त माणसांची आता खपे लबाडी आणि नियमावलीत बसता बसता न लाच देता

माझ्याच जाहलो मी भाडेकरू बिऱ्हाडी तसेच मी मायबाप नेतो घे सर्व तूच बाकी भावा अता तरी तू घे खालती कुऱ्हाडी हे या गझलेतील तीन शेर काबिले तारिफच आहेत. त्यातल्या त्यात भावाचा शेर भाऊबंदकीवर तीर रोखून आहेत.

स्पर्श मातीचा तुझ्या पायास नाही आणि ताऱ्यांचा मला हव्यास नाही अशी पाय जमिनीवर रोवून बसलेल्या माणसाची 'स्पर्श मातीचा' ही गझल आहे. त्यांच्या 'विषवेली' 'भला, 'वादी संवादी' 'जात' आणि 'प्यालो जरी किती मी' 'गडी' या गझल नेमकेपणाने समाजाच्या विसंवादावर बोट ठेवतात. नरहर रामचंद्र कुलकर्णी यांच्या 'मैफल', 'हवाई' या प्रेमाच्या गझलमध्ये तरुणांसह प्रत्येकाला आपले तारुण्य दिसेल. 'चेहरा,' 'सार' या गझल समाजजीवनाचे चिंतन करणाऱ्या आहेत. 'वळकट', ही वेगळ्या धाटणीची गझल आहे. जीवनपट उलगडून दाखवणारी ही गझल खरोखरच भावणारी आहे. 'नाळ'मध्ये विषमतेवर आणि समाजातील दुहीवर प्रहार आहे. 'नाळ इतिहासात मिळते आज जी प्रथा आहे मूक आणि दुर्बलांची जीभ ज्यांनी छाटली' असा विषाद ते व्यक्त करतात. त्यांच्या इतरही गझल विचारप्रवण करतात.

प्रसाद माधव कुलकर्णी यांची 'मेण' ही गझल दुःख हा आपल्या जीवनाचा स्थायीभावच आहे. तो नसेल तर जीवन कसले, असा सवाल करते. दुःख आणि माणूस म्हणजे तेल आणि वातच जणू. ते सांगतात, दुःखास एकट्याला सोडायचे कसे? मज एकटेपणाने करमायचे कसे? आणि मी बोललो धगीला तू दूर हो जरा मेणास ज्ञात असते वितळायचे कसे? सामान्याच्या विकारांसाठी हा शेर असावा. माणसाचा पाय कुठे आणि कसा घसरेल हे सांगता येत नाही, असे हा शेर सुचवून जातो. 'कंटाळा', 'चोरी','उगाच नाही ओळख बनली' या गझला विचार करायला भाग पाडतात. 'अंतर' ही प्रेमाची गझल आहे. 'प्रेमऋतूची नशा गुलाबी । उरात भिजते नसते उतरत' असे सांगणारा हा शेर एकदा झालेले प्रेम जन्मभर उतरत नसते. किंवा नसावे असे सांगून जाते. 'स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव' मधून त्यांच्यातील सामाजिक कार्यकर्ता डोकावतो. 'बाप' ही गझल बापाचे किंवा वडिलांचे महत्त्व विशद करतेच. आईवर अनेकजण कविता गझल लिहितात. परंतु बापाविषयी ते पोटतिडिकीने लिहितात. 'या हयातीत कोठे उमगतो बाप केव्हा बाप झाल्याविना ना समजतो बाप केव्हा' मुले आपल्या बापाला अनेकदा किंमत देत नसतात. त्यांनी हा शेर वाचला पाहिजेच. शेवटी ते म्हणतात, 'बाप शोधायचा तर बाप समजून घ्यावा फक्त दारी घरी का गवसतो बाप केव्हा? 'मी फक्त गझललो होतो' आणि कट्यार' मध्ये त्यांनी गझलेची आणि शेरांची महती सांगितली आहे.




श्रीराम पचिंद्रे यांच्या 'उत्तरे', 'रंग' या गझल अंतर्मुख करायला लावतात. रंगमध्ये ते सहजच म्हणून जातात की, रोजचा परकेपणा हा एकदाचा संपला आज पहिल्यांदा स्वतःला पाहिले जवळून मी आपण आपल्याला कधी जवळून पाहतच नाही. आपण प्रत्येकवेळी वेगवेगळे वागतो परंतु एकदा का आपण मुखवटे बाजूला सारून स्वतःला पाहण्याचा प्रयत्न केला की सगळा परकेपणा दूर होतो. स्वतःला स्वतःची ओळख पटते, असे गझलकार सांगतो. 'सावळी', 'देणे' आणि 'पान खुणेचे', 'आता' या गझलातून देखील जीवनाला आपण कसे ओळखावे, हे गझलकार सांगतो. मनीषा रायजादे पाटील या गझलकारा कोल्हापूर जिल्ह्यातीलच. 'घे जरासे' ही शृंगारिक गझल. 'शृंगार आज केला निरखून घे जरासे । ओठास ओठ माझे बिलगून घे जरासे' आदी शेरांतून हा शृंगार दिसत असला तरी शेवटचा शेर मात्र जीवनाचे तत्त्वज्ञान सांगतो, त्या म्हणतात, फुलवित नभात माझ्या ही रात चांदण्यांची अधरातले उसासे सजवून घे जरासे नभात चांदण्यांची म्हणजे सुखाची रात्र असली तरी अधरात मात्र दुःखाचे उसासे व हुंदके आहेत, तेही सजवून घे. ऐक माणसा ही उपदेशपर गझल आहे. 'आता', 'काय बोलू', असे विचारत त्या राख झालेल्या मनावर काय बोलू अशी खंतही व्यक्त करतात. आवरावे मी' ही गझल पावसाला उद्देशून असली तरी प्रेम आणि विरहाची आहे. त्यांच्या इतरही गझला वाचनीय आहेत. सारिका पाटील यांच्या गझलाही दखल घेण्याजोग्या आहेत. तू भेटल्यावर मनात कोणतीच कामना उरली नाही, असे त्या ठासून सांगतात. प्रवीण पुजारी हे अभियंता असूनही गझलेत रस घेतात. वीज खात्यात असल्याने त्यांचे काही शेर झटके (शॉक) देतात. स्पर्धा या गझलमध्ये ते जाणवते. हंस होऊनी जीवनातले दूध सुखाचे । दुःखाच्या पाण्यामध्ये शोधत आहे ।। आणि माझ्या 'मी'ली स्पर्धांमध्ये हरवत आहे, या शेरात हे झटके जाणवतात. त्यांनी गझलेत झुल्काफिया, काफियारंभ, तीन काफिया,मक्ताबंद गझल असे प्रयोग केले आहेत.

डॉ. सुनंदा सुभाष शेळके या विदुषी गझलकार आहेत. त्यांच्या 'राजा शाहू'मध्ये त्यांनी राजर्षी शाहू महाराजांना वंदन करून त्यांचे गुणवर्णन केले आहे. सामान्यांसह दलितांनाही हृदयामध्ये । दिले जयाने स्थान असा हा राजा शाहू ।। असा सद्‌गुणांची खाण असलेला राजा म्हणजे नियतीला पडलेले सुखद स्वप्न असे त्या नमूद करतात. 'कातर गझला' मध्ये गझल आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग कसा आहे, हे त्या स्पष्ट करतात. 'चंद्र उगवला पुनवतिथीचा' ही प्रेमाची रोमँटिक गझल आहे. 'सहज म्हणाले' ही देखील त्याच अंगाने जाते. त्या म्हणतात 'कधीतरी तू प्रियकर होना सहज म्हणाले अवचित येऊन जवळी घेना सहज म्हणाले' हे सांगताना पुरे जाहल्या चोरून भेटी राजरोस तू । घेऊन ये ना सजवून मेणा सहज म्हणाले ।। ही जुन्या पुराण्या प्रीतीची नव्हे तर समाजाच्या भीतीने मनात दडपलेल्या प्रेमाला वाट मोकळी करून देणारी गझल आहे. केवळ प्रेमाच्याच नव्हे तर गुन्हाच केला'मधून त्या सभ्य माणसांची घालमेल दाखवतात. माझ्या आतून' ही गझल घाव जिव्हारी विसरून माफी करते तेव्हा देवाचेच दर्शन आतून घडते असा साक्षात्कार त्यांना वा वाचकांना घडवून जाते. तरुणा ही गझल तरुणांनी सन्मार्गाने चालावे असा बोध करते. परिस्थितीने खचू नकोस असा सल्लाही देते.

अरुण सुनगार यांच्या अकरा गझला यात समाविष्ट आहेत. 'आयुष्याची विहीर' मध्ये अरुण म्हणतो, अंतरातला ईश्वर जपणे इतके सोपे नसते चिखलामधुनी नितळ वाहणे इतके सोपे नसते घाव घालती चहुदिशांनी प्रलोभनांचे भाले चारित्र्याची ढाल पकडणे इतके सोपे नसते हे शेर वाचून नक्कीच म्हणावेसे वाटते गझल अशीही लिहीत जाणे सोपे नसते. संजीवनी तोफखाने या 'लिहून जाते' म्हणत छान गझल लिहून जातात. 'प्रेमामध्ये दुःख लाभते आहे ठावे असे सांगताना आयुष्याचा कंटाळाही करून चालत नाही', ते जगावंच लागतं असे स्पष्ट करतात. 'आंदण' मधून त्या पुढच्या पिढीला संस्काराचे आंदण देऊ पाहतात. 'बाजार' ही गझल कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लोकांना किती त्रास झाला व प्राक्तनात हा आजार त्रासदायक ठरतो आहे, हे त्यांनी गझलच्या माध्यमातून प्रकट केले आहे. 'चांदणे' या गझलेत निरनिराळ्या प्रतिमांतून सत्य कथन त्या करतात. अशोक वाडकर (पवार) हे देखील आर्किटेक्ट व इंजिनिअर महापालिकेत सेवा करूनही गझलेच्या आणि कवितेच्या सेवेत ते 1967 पासून कार्यरत आहेत. त्यांनी चित्रपटासाठी गीतेही लिहिली आहेत. गजानन वाटवे, विश्वनाथ मोरे, बाळ पळसुले आदींनी त्यांच्या रचना स्वरबद्ध केल्या आहेत. 'अमावस्येला चंद्र निथळतो तू दिसल्यावर । वैशाखातच श्रावण फुलतो तू दिसल्यावर', 'ग्रीष्मझळांचे लोळ निवळती संथ गतीने । झुळझुळणारा वात वाहतो तू दिसल्यावर।' यातील ती कदाचित कविता, गझल आणि प्रेयसी असे कुणीही असेल. जगणे कसे म्हणावे तगणेच भाग झाले असे म्हणत मी साहिला सदाचा मृत्यूच जीवनाती । मरणास वाहताना जगणेच भाग झाले।। जगताना सदैव मृत्यूचे भय डोक्यावर असतेच पण जगण्याची आस मरू देत नाही. बाराही गझलकारांच्या गझल वाचताना आपल्या अनुभवाशी तादाम्य पावण्याचे समाधान मिळते.

तुकारामनीती
भाग 18

# क्षणभंगुर नाहीं भरवसा...



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**वारकरी संतांनी समाजमनाची मशागत करतांना मानवी जीवनाच्या यथार्थ सिद्धता सहजतेने कथन केलेल्या दिसून येतात. माणसाच्या जीवन-जगण्याचा साक्षीभूत अनुबंध संतांच्या अभंगातून अधोरेखित होतांना दिसतो. संत तुकोबा तर चालते-बोलते अनुभवाचे विद्यापीठ ! त्यांच्याविषयी ते**

**चालते अनुभवाचे बोल । शब्द शब्द निर्वाळती सखोल॥**
**घडली जनक्रांती अनमोल। नाही मापदंड तयालागी॥**

**असे लिहिल्यास वावगे होणार नाही. तूकोबांनी आपल्या ऐहिक जीवन परीपेक्षातून अलौकिक चिंतनाचं कोंदण सामान्य जनांशी मुक्त करून विचारप्रवण केले आहे हे विशेष ! कोणताही चिंतक किंवा विचारवंत असो, त्याने केलेल्या चिंतन-मंथनातून जे जीवनसार सहजतेने झिरपते तेच प्रत्यक्षपणे अक्षररुपाने कागदावर प्रतिबिंबित होत असते यात तिळमात्र शंका नाही.**

तूकोबांनी लिहिलेल्या आणि शिल्लक राहिलेल्या अभंगामध्ये अभ्यासकांनी त्या अभंगांचे विविध भागात विभागणी करून वाचकांना गाथा सुलभ करून दिला आहे. तूकोबांनी आपली नितीतत्वे विषद करतांना जीवनाच्या आणि संप्रदायाच्या सर्वच अंगांनी अभंग लेखन केलेले आढळून येते. त्यांचे अभंग कोडे, डाका, फुगड्या, हमामा, अडसन-दळण, हाल, मृदंग-पाट्या, वासुदेव, गावगुंड, जोगी, सरवदा, मुंढा, डोईफोडा, मलंग, दरवेस, वैद्यगोळी, सौऱ्या, लळीत, आशीर्वाद आणि अन्य विविध भागात विभागले असून त्या अनुषंगाने विविध विषयावरील त्यांचे चिंतन लोकाभिमुख होतांना लक्षात येते.

आज तुकाराम नीती अंतर्गत चिंतनासाठी संत तुकोबांच्या "वासुदेव" प्रकरणातील अभंग निवडला आहे. वासुदेव ही महाराष्ट्रातील अत्यंत, गरीब, भूमिहीन, भिक्षाटन करणारी फिरस्ती जमात असून ते सकाळी सकाळी गावभर फिरून अभंग, गवळणी, विविध कवण गायन करून भिक्षा मागतात. महाराष्ट्र संस्कृतीचे गाढे अभ्यासक डॉ.रा.चि.ढेरे हे वासुदेव याविषयी "वासुदेव ही संस्था म्हणजे लोकसंस्कृतीच्या क्षेत्रातील भागवत संप्रदायच आहे" असे लिहून वासुदेव हे महाराष्ट्र नांगरी संस्कृतीचे अविभाज्य घटक म्हणून संबोधतात. वासुदेवाच्या गाण्याचे वैशिष्ट्ये म्हणजे ते लोकांना इहलोकात सत्कर्म करण्याचा उपदेश करतांना माणसाचे जीवन म्हणजे "पाण्याचा बुडबुडा असून तो केंव्हाही फुटू शकतो" असे सरळ-सोपे तत्वज्ञान सांगून दात्या व्यक्तीला स्थानिक दैवतांना दान पावल्याची ग्वाही देऊन शेवटी आशीर्वाद देऊन निघून जातात. तूकोबांनी आपले काही अभंग लिहितांना "वासुदेव" या लोककलावंताचा आधार घेऊन समाजाची कानउघाडणी करण्याचे काम केले आहे.

**गातों वासुदेव मीं ऐका । चित्त ठेवुनि ठायीं भावें एका ।**
**डोळे झाकुनि रात्र करूं नका । काळ करीत बैसला लेखा गा ॥१॥**
**राम राम स्मरा आधीं । लाहो करा गांठ घाला मूळबंदीं ।**
**सांडावा उगिया उपाधी । लक्ष लावुनि राहा गोविंदीं गा ॥धृ.॥**
**ऐसा अल्प मानवी देह । शत गणिलें अर्ध रात्र खाय ।**
**पुढें बालत्व पीडा रोग क्षय । काय भजनासि उरलें तें पाहें गा ॥२॥**
**क्षणभंगुर नाहीं भरवसा। व्हा रे सावध सोडा माया आशा ।**
**न चले बळ पडेल मग फासा । पुढें हुशार थोर आहे वोळसा गा ॥३॥**
**कांहीं थोडें बहुत लागपाठ । करा भक्ती भाव धरा बळकट।**
**तन मन ध्यान लावुनियां नीट । जर असेल करणें गोड शेवट गा ॥४॥**
**विनवितों सकळां जनां । कर जोडुनि थोरां लाहनां ।**
**दान इतुलें द्या मज दीना । म्हणे तुकयाबंधु राम ह्मणा गा ॥५॥**
**(शा.अ.गाथा अ.क्र. 430)**

अभंग मोठा गमतीशीर आणि सरळ, सोपा, कुणालाही समजणारा आहे. कोणत्याही विचाराची कक्षा ही मानवी जीवन आणि त्याचे सार्वकाल उत्थान हीच असते हे प्रकर्षाने जाणवते. संत तुकोबाराय समाजप्रबोधन करण्यासाठी अक्षरशः वासुदेव होऊन मार्गदर्शन करतांना लोकांना वर्तमान आयुष्य अत्यंत मौल्यवान असून सर्वांनी सतत सावध राहणे गरजेचे आहे हे सांगतांना "काळ करीत बैसलासे लेखा" असे म्हणून आपल्या जीवनातील एकएक अनमोल क्षण निघून जात असून तो प्रत्येक क्षण आपण कारणी लावावा असे प्रतिपादन करतात. या अभंगातील "लाहो करा, गाठ घाला मूळ बंदी" हा भाग अत्यंत महत्वाचा असून यातून तुकोबा महर्षी पतंजली यांनी सांगितलेले मूल बंध, जालंदर बंध आणि उड्डयान बंध या तीन बंधांचा उपयोग करायला सांगताहेत. गाठ मुळबंदी म्हणजेच मूलबंध असून हे त्रिबंध माणसाची चयापचय क्रिया मजबूत ठेवतात. त्याचबरोबर मनाची एकाग्रता आणि पचन संस्था मजबूत करतात, म्हणून प्रत्येकाने हा त्रीबंधात्मक प्राणायाम करून ज्या काही अन्य सांसारिक उपाधी म्हणजेच भानगडींचा त्याग करावा. माणसाचे जीवन अत्यंत अल्प असून त्यातील अर्धे जीवन तर माणूस झोपण्यात, खाण्या-पिण्यातच घालवतो, मग सत्कर्म करायला वेळ कुठे शिल्लक राहतो ? असा प्रश्न तुकोबा उपस्थित करतात.

त्याशिवाय मानवी जीवनाची क्षणिकता अत्यंत विचारणीय असून जीवनातील जास्तीत जास्त वेळ हा भक्ती म्हणजेच आपले नियोजित कर्म इमाने-इतबारे करण्यात व्यतीत करण्याचे आवाहन करतात. प्रत्येकाने तन, मन, आणि ध्यान आपल्या जीवनाच्या उत्थानावर केंद्रित करून स्वतःचे कल्याण करून घ्यावे. शेवटी लहान-मोठ्यांना तुकोबा दोन्ही हातांनी वंदन करून मला एवढेच दान द्यावे अशी नम्रपणे मागणी करतांना दिसून येतात. सर्वच वारकरी मंडळी तुकोबांचा हा अभंग नियमितपणे आपल्या काकडारतीचे भजन म्हणतांना गायन करत असतात. असे अभंग आणि विचार वारकरी सातत्याने आपल्या सोबत बाळगत असल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आपल्याला कोणतेही संसारिक दुःख दिसून येत नाही हे विशेष !

या वासुदेव अभंगातून तुकोबांना अपेक्षित असणारा समाज घडवायचा आहे. त्यासाठी तुकोबांचे अभंग एका कालमर्यादेत बसत नसून ते सार्वकालिक विचार प्रसृत करतांना अधोरेखित होतात. तूकोबांनी आपल्या अभंगातून चिंतन मांडतांना सामान्य माणसाला सखोल विचार करायला भाग पडले आहे. मानवी देह आणि जीवन क्षणाक्षणाला बदलत असते. बाल्य, तारुण्य आणि जरा ह्या अवस्था चक्रासारख्या सतत वलयांकित होत असून यातून कुणीच सुटला नाही हे विशेष ! माणसाच्या जीवनाची क्षणभंगुरता सांगून संत आणि विचारवंतांनी मृत्यू, दुख, वेदना याची तीव्रता कमी करण्याचा महाकाय प्रयत्न आपल्या लेखन आणि विचारातून केला आहे. कोणत्याच माणसाला मरण हा शब्द सुद्धा ऐकावा वाट नाही. श्रीमद् भगवतगीतेची टीका भावार्थदीपिका अर्थात ज्ञानेश्वरीमध्ये संत ज्ञानेश्वर लिहितात,

**आगा मर हा बोल न साहती । आणि मेलिया तरी रडती ॥**

असे असतांना संत तुकोबाराय मरण म्हणजे जीवनाचे एक चक्रच असून "जन्मल्या पिंडाते मरण सांगाती" असे लिहून माणसाला हसत हसत मरायला तयार करतात. हाच तुकोबांच्या आणि अन्य वारकरी संतांच्या लेखनाचा सर्वकाळ विजयच म्हणावा लागेल.

तुकोबांच्या अभंगांचे वैशिष्ट्ये म्हणजे ते मरण आणि स्वधर्म एवढं सहजतेने करायला सांगतांना उथळ आणि संकुचित लोकांना सावध करून जातात. माणसाने सहजतेने देहासक्ती टाकून देह हे साध्य नसून ते स्वकर्म करण्याचे साधन आहे याची आठवण करून देतात. तुकाराम नीती लिहिण्याचे कारण म्हणजे कुठलीही विद्वत्ता पाजळणे नसून वर्तमानात माणसं अतिभौतिक साधनांच्या आहारी जात असून त्यांनी मृत्युच्या भीतीपोटी अनेक दुर्धर व्याधींना कवटाळले आहे. त्यामुळे आपण "देह आणि देह संबंधे निंदावी, इतरे वंदावी श्वान सुकरे" असे वर्तन करणे अपेक्षित आहे. मानवी जीवन आणि विचारांना व्यापकत्वाची झळाळी येण्यासाठी आपल्या स्मृती जागृत ठेवून आपले विहित कर्म इमानदारीने करत जावे. असे केल्यास कुणाचीच भीती बाळगण्याची गरज नाही. प्रत्येकाने प्रत्येक क्षणाला आपले जीवन मर्यादित असून एकदिवस आपल्याला ही इहलोकीची यात्रा संपवायची आहे, याची नित्य आठवण ठेवायला लावणारा हा अभंग आहे. असे झाल्यास कुणी कुणाचा द्वेष करणार नाही, कुणी भ्रष्टाचार, चोरी करणार नाही. तेंव्हा सर्वांनी या अभंगाचे व्यवस्थित चिंतन करून आचरण केल्यास, त्रीबंधात्मक प्राणायाम केल्यास आणि उद्याची चिंता सोडून दिल्यास तुकोबांच्या अभंगांचे आणि आमच्यासारख्या लेखक-हमालांच्या जीवनाचे सुद्धा सार्थक झाल्याशिवाय राहणार नाही !

जय तुकोबाराय !

**(टीप: लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**


# गीतांजली कुलकर्णी - प्रगल्भ चरित्र अभिनेत्री आणि सान्या मल्होत्रा - समंजस नायिका-अभिनेत्री

आधुनिक केसरी




चित्रपट परीक्षण





नंदिनी देशमुख, संपर्क क्र. 9850018610

गीतांजलीच्या करियरची सुरुवात नाटकांपासून झाली. तिने दिल्लीच्या राष्ट्रीय नाट्य विद्यालयात प्रशिक्षण घेतलं आणि लेखक-दिग्दर्शक परेश मोकाशींच्या मु.पो.बोंबिलवाडी, लग्नकल्लोळ या औपरोधिक विनोदी नाटकांमध्ये दणाणून कामे केली. तिचा वावर मराठीप्रमाणेच इंग्रजी व हिंदी सिनेमा/मालिकांमध्येही राहिलेला आहे. मराठीत अगबाई अरेच्चा, आनंदीगोपाळ या चित्रपटांत तिने अगदी लहानशा भूमिका केल्या तरी त्या स्मरणात राहिल्या. कोर्ट आणि अलीकडचा कारखानीसांची वारी यांतल्या भूमिका तर लक्षवेधीच आहेत. त्यासाठी तिला पुरस्कारही मिळाले. टिपिकल नायिका ती कधीच नव्हती. कोर्टमधली अभ्यासू व शिस्तशीर वकील महिला घरी पोचल्यावर सहजपणे दक्ष गृहिणीत रूपांतरित होते. घरकाम संपवून शिल्लक वेळात प्रामाणिकपणे केसच्या कागदांत डोके घालून बसते आणि दुसऱ्या दिवशीच्या कोर्टातल्या सुनावणीची जागून तयारी करते.

ध्यास-एक नवी ओळख या चित्रपटात तिने मध्यवर्ती भूमिका साकारली आहे. एड्समुळे मरण पावलेल्या नवऱ्याची बायको, स्वतःही एड्सग्रस्त असलेली मध्यमवयीन स्त्री आणि एका 10-12 वर्षांच्या मुलाची आई तिने उभी केली आहे. मुलाचे भविष्य अंधारात असतानाही खंबीर राहून जगणारी, जगाने वाळीत टाकलेली बाई तिच्या जिवंत अभिनयामुळे अविस्मरणीय झाली आहे. यूट्यूबवर हा सिनेमा पाहायला मिळतो. फोटोग्राफ, इज लव इनफ, सर? या हिंदी सिनेमांमध्ये कामवालीच्या भूमिकांतही तिच्या अभिनयाची चांगली चुणूक दिसते.


गुल्लक (1, 2, 3) या वेबसिरीजमध्ये ती साधी पण हुशार गृहिणी होती. दोन मोठ्या मुलांची आई, मध्यमवर्गीय नोकरदाराची पत्नी, घरादाराची काळजी घेणारी व प्रसंगी नवऱ्यालाही सुनावणारी मध्यममार्गी, मधयमवयीन महिला तिच्या रूपात प्रेक्षकांना भेटली. ताजमहाल 89 या सिरीजमध्ये कॉलेजातली बुद्धिमती प्राध्यापक आणि कुटुंबातली घरंदाज स्त्री दोन्ही तिची रूपे विलोभनीय होती. अनपॉज्ड - नया सफर, आर्या - 2 ह्या अलीकडेच आलेल्या तिच्या वेबसिरीज. आर्यामधला तिचा भ्रष्ट पोलीस इन्स्पेक्टरचा काही मिनिटांचाच रोल ठसा उमटवून गेला. सचिन कुंडलकरच्या अगदी ताज्या कोबाल्ट ब्लूमध्ये पारंपरिक, सश्रद्ध, पापभीरू पत्नी आणि आई तिने उत्तम रंगवली आहे. त्या सिनेमात धीटपणे आलेल्या दृश्यांच्या पार्श्वभूमीवर गीतांजलीचा अभिनय उठून दिसण्याइतपत जाणवणारा झाला आहे.

सान्याचा मी पाहिलेला पहिला सिनेमा फोटोग्राफ. अबोल परंतु अत्यंत संवेदनशील व्यक्ती तिने त्यात उभी केलीय, फक्त मुद्राभिनयातून. अजूनही तो मी विसरलेली नाही. त्यानंतर बघितला बधाई हो. त्यात आपल्या होणाऱ्या सासूच्या बाजूने बोलणारी ती एकमेव, आपल्या होणाऱ्या नवऱ्याला समजावते, त्याबरोबरच स्वतःच्या आईसमोरही ठाम राहते. आणि मग पाहिला पगलैट. पाच महिन्यांची जुजबी ओळख. कधी जवळही न आलेला, न बोललेला नवरा. काय वाटणार त्याच्याबद्दल ? आईवडिलांनी तिच्या मनाचा विचार न करता ठरवलेलं लग्न, तिला पसंत नसलेलं. कशीतरी तिथे अॅडजस्ट झालेली. तो कशानं गेला, हे माहीत नाही. पण सुटल्यासारखं वाटतं तिला. वागणंही तसंच... काही लपवाछपवी नाही, खोटं दुःख दाखवणं नाही. मैत्रिणीसह 12-13 दिवस घरात काढते. सासूसासऱ्याचं दुःख जाणून असते. आईलाही फारसं गिनत नाही. पुढचं अख्खं आयुष्य समोर असतं, त्याचा मनोमन काही विचार सुरू असणारच. इतर नातेवाइकांची चाड बाळगायचं तिला काही कारण नसतं. हुशारीनं स्वतःवर दोषारोप न येऊ देता सगळ्यांतून आपली सुटका करून घेते, पण त्याच वेळी सासूसासऱ्यांच्या जबाबदारीची जाणीव ठेवत त्यांना न दुखावता स्वतंत्र मार्ग चोखाळते. हा शेवट मला अगदी आवडला. बाकी हे कसकसं होत जातं, ते प्रत्यक्ष पाहण्यातच मजा आहे.

दंगल चित्रपटात अमीरखानची ती धाकटी मुलगी झाली होती. कुस्तीच्या स्पर्धांमध्ये भाग घेऊन जिंकत राहणाऱ्या दोन शाळकरी बहिणींपैकी ही दिसायला नाजुक असली तरी तिच्या कामगिरीने प्रेक्षकांचा तो समज खोटा ठरतो. मर्दानी हालचाली आणि लकबींमुळे तिची भूमिका दुय्यम असूनही महत्त्वाची ठरते, लक्षात राहते. मीनाक्षी सुंदरम् या सिनेमात ती अगदी दाक्षिणात्य मुलगी वाटते. कुरळे केस, सिल्क साड्या आणि भाषा. उच्चशिक्षित, लग्नाळू मुलगी अगदी शोभलीय ती. तिचा प्रसन्न अभिनय, उत्साही चेहरा आपलाही मूड बदलून टाकतात.

वर उल्लेखिलेले चित्रपट नेटफ्लिक्स, प्राइम, सोनी लिव या ओटीटी प्लटफॉर्मवर पाहता येतील.

आधुनिक केसरी
प्रथम वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा




प्रोप्रा. बशीर करीम सय्यद
Mob. 8793815151

हॉटेल क्रिस्टल कोर्ट

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यामागे, मुंबई-पुणे रोड, पिंपरी चौक, पिंपरी, पुणे - ४११०१८ फोन ०२०-६५७०६१५१/२७४२०४४९

लॉजिंग, मिटींग हॉल इत्यादी
उत्तम सेवा, मध्यवर्ती लोकेशन




# चतु:सूत्रीतून गणिताचा पाया मजबूत

आधुनिक केसरी

**अ) गणिताची मुलभूत संकल्पना : संख्यांचे प्रकार**

१) मोजसंख्या किंवा नैसर्गिक संख्या :



श्रीमती छाया खेडकर
संपर्क क्र. 8888780568

ज्या संख्यांची सुरुवात १ पासून होते परंतु त्यांचा शेवट होत नाही, त्या संख्यांना मोजसंख्या किंवा नैसर्गिक संख्या म्हणतात.

उदा. १) १,२,३,४,५... इत्यादी

उदा. २) मोजसंख्या किंवा नैसर्गिक संख्या : ९,१५,२५,४९,१०० इत्यादी.

२) क्रमागत नैसर्गिक संख्या : दिलेल्या लगतच्या संख्यात "१" चा फरक असतो. अशा संख्यांना क्रमागत नैसर्गिक संख्या म्हणता. (पुढची संख्या एकने मोठी असते आणि मागची संख्या एकने लहान असते.)


उदा. १) ३,४,५,६,७,८,९... इत्यादी क्रमागत नैसर्गिक संख्या आहेत.

उदा. २) १२,१७,२०,३५ या क्रमागत नैसर्गिक संख्या नाहीत.

लक्षात ठेवा : १) नैसर्गिक संख्या अनंत आहेत. (शेवट होत नाही.)

२) नैसर्गिक संख्या शून्यापेक्षा मोठ्या असतात. म्हणून त्यांना धनसंख्या असेही म्हणतात.

३) नैसर्गिक संख्यांचा संच $N = \{1,2,3,4,5....\}$ ने दर्शवतात.




**ब) मुलभूत संकल्पना प्रश्नसंच :**

१) नैसर्गिक संख्यांची सुरुवात कोणत्या अंकाने होते?

२) नैसर्गिक संख्यांना कोणत्या संख्या म्हणतात?

३) नैसर्गिक संख्यांचा संच कोणत्या अंकाने दर्शवतात?

४) १६,१८,२२,२७ या क्रमागत नैसर्गिक संख्या आहेत का? कारण काय?

५) कोणत्याही पाच क्रमांगत नैसर्गिक संख्या लिहा?

**क) उखाणा :**

१) माता सतीचे एक नाव आहे कामाख्या,
एकने सुरुवात होणाऱ्या असतात मोजसंख्या किंवा नैसर्गिक संख्या

२) मठाधिपतींचा समानार्थी शब्द आहे महंत,
नैसर्गिक संख्या असतात अनंत.

ड) कविता : छापलेले पान क्रमांक ४, ५

(क्रमशः)



# धुळ्यात मोकाट गुरांचा हैदोस; महापालिका प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज


**धुळे :** शहरात मोकाट जनावरांनी हैदोस घातला असून यामुळे वाहन चालकांसह विक्रेत्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मुख्य रस्त्यावरच या मोकाट जनावरांचा सुळसुळाट झाला असून अपघाताची टांगती तलवार वाहन चालकांना दिसून येत आहे. या समस्यांबाबत वारंवार तक्रार करूनही धुळे महापालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याची व्यथाही धुळेकर नागरिकांनी आधुनिक केसरी वार्ताहरांसमोर मांडली आहे. धुळे शहरातील विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरांच्या कळपाने थैमान घातला आहे. काही रस्त्यावर अचानकपणे ही मोकाट जनावरे रस्ता ओलांडत असताना छोटे-मोठे अपघात झाल्याचे पाहवयास मिळत आहे. त्यामुळे ही समस्या वाहनधारकांसाठीही डोकेदुखी ठरत आहे. तर भाजीपाला विक्रेत्यांनाही मोकाट जनावरांचा त्रास सहन करावा लागत आहे. तर अबालवृद्धांच्या जीवालाही धोका निर्माण झाला आहे. धुळे महापालिका प्रशासनाला या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्यासंदर्भात अनेक वेळा निवेदने देऊन पाठपुरावा करण्यात आला आहे. मात्र, महापालिका प्रशासनाच्यावतीने थातूरमातूर कारवाई केली गेल्यानंतर परिस्थिती जशीच्या तशी दिसून येत आहे. त्यामुळे धुळेकरांसाठी ही समस्या नित्याचीच झाली आहे. तर महापालिका जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची व्यथा ही धुळेकर नागरिकांनी अधुनिक केसरी च्या वार्ताहरांसमोर मांडली आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा समिती, नवथळच्या अध्यक्षपदी अनिरुद्ध रमेश गोपनारायण

आधुनिक केसरी न्यूज



**अकोला :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा समिती, नवथळ च्या अध्यक्ष पदी अनिरुद्ध रमेश गोपनारायण, (खेकडी) यांची लोकशाही पद्धतीने निवड करण्यात आली. तीन गावांच्या मिळून चालणाऱ्या या समितीवर ऐकून नऊ (९) सदस्यांनी लोकशाही पद्धतीने मतदान करून बहुमताने शाळेचे मुख्याध्यापक तथा सचिव प्रमोद फुलसंगे यांच्या प्रमुख उपस्थितीत अनिरुद्ध गोपणरायन यांची निवड केली, यानंतर समस्त ग्रामस्थांनी त्यांचे फुलं देऊन अभिनंदन केले. धम्म कार्यात, कामगार, शेतकरी, कष्टकरी आणि समाजकार्यात सदैव अग्रेसर असणारे अनिरुद्ध गोपणरायन हे खेकडी गावचे रहिवाशी असून या समिती अंतर्गत येणाऱ्या खेकडी, नवथळ व परितवाडा या तीन गावांमधू ही निवडणूक झाली होती. अनिरुद्ध हे उपसरपंच सौ.साधना गोपणरायन आणि बोधचार्य रमेश गोपणरायन यांचे यांचे सुपुत्र आहेत. नवनिर्वाचित अध्यक्ष या नात्याने अनिरुद्ध गोपणरायन म्हणाले की, गावातील शाळेच्या, विद्यार्थ्यांच्या आर्वांगीन विकासासाठी अविरत मेहनत करून, झटून कार्य करणार असे याप्रसंगी बोलताना म्हणाले.




आधुनिक केसरी
आधुनिक केसरीच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त तसेच
माजी मंत्री पंकजा मुंडे यांना वाढदिवसाच्या
हार्दिक हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
प्रा. डॉ. बिभीषणरावजी फड
उपप्राचार्य खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई,
माजी उपसभापती पं.स. व कृ.उ.बा.संचालक, परळी वै.


शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
DC दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122


आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार


• घाऊक आणि किरकोळ
• किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे
• घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

आधुनिक केसरी
पहिल्या वर्धापन दिनाच्या भरगच्च - भरभरून शुभेच्छा... !

सुरेश सिरसीकर
संस्थापक अध्यक्ष

रवींद्र बनकर
उपाध्यक्ष

अपर्णा मेहता
सचिव
होल्डिंग हॅन्ड्स
बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद
समाजाच्या हितासाठी एकमेकांचा हात धरून मानवी साखळी बनवूया.



# मेघ मल्हार व्याख्यानमालेत डॉ.नेवपूरकरांचे आरोग्यावर व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था, स्फूर्ती महिला मंडळ, आणि रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद मिड टाउन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मेघ मल्हार व्याख्यान मालेचे द्वितीय पुष्प गुंफण्यासाठी प्रसिद्ध आयुर्वेद तज्ञ डॉ. संतोष नेवपुरकर यांचे "ज्येष्ठांचे आरोग्य" या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. डॉ. नेवपुरकर यांनी आपल्या भाषणात ज्येष्ठांचा ऋतूनुसार आहार कसा असावा यावर मार्गदर्शन केले. प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक संस्थेचे भरत कुलकर्णी हे अध्यक्षस्थानी होते. उपाध्यक्षा विभा श्रीवास्तव, सचिव श्रीकांत पत्की, स्फूर्ती महिला मंडळाच्या अध्यक्ष मंजुषा कोरंगळीकर, सचिव शुभदा जोशी, रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद मिड टाऊन च्या अध्यक्षा दिव्या मराठे, उल्हास मराठे, सचिव माधुरी काथार यावेळी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, काही व्यक्ती काय खावे काय खाऊ नये याचा विचार न करता, वजन कमी करण्यासाठी, मनानेच सलाड खातात. पावसाळ्यात काकडी खाऊ नये. उन्हाळ्यात खावी. आहार पचायला हलका घ्यावा. कच्चे खाऊ नये, पावसाळ्यात हितकर आहार घ्यावा. लाह्या किंवा लाह्याचे सूप घ्यावे. पालेभाज्या खाऊ नये. वेगवेगळे सूप घ्यावे. पालकाचे, गाजराचे, भाज्यांचे सूप घ्यावे. पचायला उत्तम असते. नाश्त्याला सूप घ्यावे. पावसाळ्यात भाजणीचे पदार्थ खावे. भाजलेले, उकडलेले खावे. यामागे शास्त्र आहे. मात्रेने कमी खावे. प्रमाणात खावे. शक्यतो एकवेळेस जेवावे. हिवाळ्यात भरपूर खावे. घरी केलेले तूप व तेल, दही, ताक शरीराला आवश्यक आहे. त्यामुळे सांध्याला वंगण मिळते. घरच्या तुपाने कोलेस्तेरोल वाढत नाही. तिळाची, जवसाची, शेंगदाण्याची, खोबर्याची अश्या वेगवेगळ्या चटण्या रोजच्या जेवणात खाव्यात. भाकरी खावी. हिवाळ्यात बाजरी खावी त्यावर लोणी टाकून खावे. तिळाचे लाडू खावे.

जेवणाचे पदार्थ गरम गरम खावे. ओवन मध्ये गरम करून खाऊ नये. पदार्थ तयार केल्यापासून ३ तासाच्या आत खावा. त्यानंतर तो शिळा होतो. आहार कसा घ्यावा हे भगवद्गीतेमध्ये सांगितले आहे. आहार पचविण्यासाठी व्याव्याम करणे आवश्यक असते. १५ दिवसातून एक उपवास करावा. ज्येष्ठांना काही व्याधी असतात बी.पी., मधुमेह, मल बद्धता, गुडघे दुखी, पण जे आयुष्य मिळाले आहे ते आनंदाने जगता आले पाहिजे. वयानुसार हार्मोनल बदल होतात. मल प्रवृत्ती कुठलेही चूर्ण न घेता व्हावी. होत नसेल तर यावर उपाय पिकलेला पेरू खावा. पेरूची कोशिंबीर खावी. पिकलेली पपई खावी, औषध व आहार वेगळ्या गोष्टी आहेत. जेवणात एक चमचा लिंबाचे एक वर्ष जुने लोणचे खावे. याने मलनिस्सारण चांगले होते, पोट साफ होते. सणाला पुरण पोळी तूप टाकून खावी. त्यामुळे त्याचा ग्ल्येसेमिक इंडेकस कमी होतो. त्यावेळी पंचामृत खावे. आंबट पदार्थ प्रमाणात खावे.

बरेच लोकांना झोप न येणे हि व्याधी असते. जुन्या लोकांची दिनचर्या पहा. ते सतत काम करत असत. शरीराची हालचाल झाली पाहिजे. शारीरिक श्रम झाले पाहिजेत. तरच झोप येईल. झोप येत नसेल तर सकाळ संध्याकाळ ३-४ किलो मीटर चालावे, मधुमेह नसणार्यांनी रात्री जेवणात शिरा किंवा जायफळ टाकून खीर खावी. झोप चांगली लागेल. बाहेरचे गोड पदार्थ खावू नयेत. ते घातक असतात. घरचे गोड पदार्थ घातक नसतात. आयुर्वेद सांगतो जेवणात गोड, तिखट, आंबट, तूरत पदार्थ असावेत. ज्येष्ठांना एकटेपणा असतो, मुले दूर गेल्यामुळे हा एकटेपणा येतो. एकटेपणा टाळण्यासाठी वाचन करावे, मित्रांशी बोलावे, गप्पा माराव्या, एकत्र सिनेमा पहावा, सहलीला जावे. यामुळे जीवन आनंदी होईल, असेही शेवटी त्यांनी सांगितले.

प्रार्थना झाल्यावर श्रीकृष्ण प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. शैला मोहनपुरकर, कविता दातार, डॉ. अरुणा खारकर, मृणाल जोशी, विमल तळेगावकर, चित्रा पिलखाने यांनी "घन घन माला नभी दाटल्या कोसळती धारा" हे स्वागत गीत सदर केले. त्यांना हार्मोनियम अशोक पाध्ये व तबल्यावर विश्वास काळे यांनी संगत केली. सर्व मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. डॉ.संतोष नेवपुरकर यांचा परिचय शिवकुमार पाडळकर यांनी केला. अध्यक्ष भरत कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सूत्र संचलन सचिव श्रीकांत पत्की यांनी केले, विभा श्रीवास्तव यांनी आभार प्रदर्शन व शैला मोहनपुरकर यांनी पसायदान सादर केले. कमलाकर पाठक, दत्तात्रय कुलकर्णी, प्रेमचंद तुल्ले, देवेंद्र श्रीवास्तव, अशोक पाध्ये यांचे सहकार्य मिळाले.

# स्वयंपाक, भोजन मंडपाची एकनाथराव जाधव यांच्याकडून पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापुर :** श्री संत शंकरस्वामी महाराज संस्थान शिऊर यांचा २७७ फिरता नारळी अखंड हरिनाम सप्ताह या वर्षी श्री क्षेत्र शिऊर येथे होणार आहे. २ ते ९ ऑगस्ट दरम्यान शिऊर येथील समाधी मंदिर प्रांगणात होणाऱ्या या सप्ताहाची तयारी वेगात सुरू असून मोठ्या प्रमाणात अन्नदान होणार आहे. सप्ताह स्थळाची व भोजन व स्वयंपाक मंडप जागेची आज संस्थानचे अध्यक्ष एकनाथराव जाधव, सचिव बबनराव जाधव, कार्याध्यक्ष पोपटराव जाधव, विश्वस्त नितीन चुडीवाल, अनिल भोसले, बंडोपंत लाखेस्वामी शिवाजी साळुंके आदींनी पाहणी करून सूचना केल्या.

संस्थानच्या पुढाकाराने बांधण्यात आलेल्या भव्य कीर्तन मंडपात कीर्तन -प्रवचनाचे कार्यक्रम होणार असून, बाजारतळात देशमुख यांच्या शेतात मोठा भोजन व स्वयंपाक मंडप उभारण्यात येत आहे, काल्याच्या किर्तनानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार असून या महाप्रसादाची देखील तयारी सुरू करण्यात येत आहे. दि ९ ऑगस्ट रोजी शिऊर येथील जय बालाजी आदिवासी आश्रम शाळेसमोर, विठ्ठलराव देशमुख नगर येथे सप्ताहाचा समारोप होणार असून जवळपास एक लाख भाविक उपस्थित राहणार आहे, संस्थानचे उपाध्यक्ष सारंगधर महाराज भोपळे यांचे काल्याचे कीर्तन होईल.








# गद्दारांना प्रेम देऊन पाप केले की काय ? असेच वाटते : आदित्य ठाकरे

## बिडकिन येथे शिवसंवादच्या तिसऱ्या दिवशी तुफान गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** आज दि.२३ रोजी पैठण तालुक्यातील बिडकिन येथे आदित्य ठाकरे यांचा शिवसंवाद दौरा संपन्न झाला. यावेळी संवाद दौऱ्यात निमित्ताने आदित्य ठाकरे बोलताना म्हणाले की, बंडखोरांना आता थैरा नाही, ही गर्दी पाहता त्यांना धडकी भरल्याशिवाय राहणार नाही, बंडखोरांकरिता मातोश्री चे दरवाजे सदा सर्वदा उघडे आहेत, मागील काळ गेला आता जोमाने कामाला लागुया असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले तसेच गद्दारांना प्रेम देऊन पाप केले कि काय असेच आम्हाला वाटतय व कर्जमुक्तीचा शेतकऱ्यांचा प्रश्न करुन दिला नाही करुन घेतला, असेही व्यक्तव्य ठाकरे यांनी बोलताना केले.

बिडकिन येथील शिवसंवाद दौऱ्याप्रसंगी माजी खासदार तथा शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, आमदार अंबादास दानवे, आमदार उदयसिंग राजपुत यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निलजगाव फाटा ते बसस्थानक परिसरापर्यंत ढोलताशांच्या गजरात व फटाक्यांची आतषबाजी करत आदित्य ठाकरे यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी गोविंदा पथकाच्या वतीने थर लावुन आदित्य ठाकरे यांना सलामी देण्यात आली. शिवसंवाद दौऱ्याचे आयोजन पैठण तालुका प्रमुख मनोज पेरे पाटील यांनी केले होते. यावेळी पैठण तालुक्यातील शिवसेना, युवासेना, महिला आघाडी प्रमुख यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. तसेच पैठण तालुक्यातील शिवसेना व युवासेना कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

बिडकिन येथील शिवसेना पैठण तालुका प्रमुख मनोज पेरे, माजी सरपंच अशोक धर्मे, ग्रामपंचायत सदस्य विकास गोर्डे, अमोल वंजारे, किरण गुजर आदींच्या वतीने कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न करण्यात आले. यावेळी संभाजी राजे व जय श्रीराम, जय मल्हार या ढोल पथकाच्या वतीने ढोलताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली व जनसेवा मित्र मंडळ च्या गोविंदा पथकाच्या वतीने थर लावुन स्वागत पर सलामी देण्यात आली.



# सावळदबारा ते जामठी रस्ता सीमांकनाच्या कामाला सुरुवात

## आमदार अब्दुल सत्तार यांच्या सूचना



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील येथे पळसखेडा शिवारात दि.२३/७/२२ रोजी सावळदबारा, गोंद्री, जामठी ते पाळसखेडा शिवारातील वनविभागाच्या जागेत रस्ता करण्यासाठी प्रादेशिक वनविभाग जळगाव आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून संयुक्तपणे मोजमाप करून 5 किलोमीटर लांब आणि 24 मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी सीमांकाम करण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

सोमवार १८/७/२२ रोजी वनविभागाच्या जागेत रस्ता करण्यासाठी प्रादेशिक वनविभागाने अंतिम परवानगी दिल्याने तातडीने रस्त्याच्या सीमा निश्चित करण्याच्या सूचना आमदार अब्दुल सत्तार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. सदरील रस्त्याच्या सीमा निश्चित करण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आल्याने याठिकाणी रस्ता करण्याच्या कामाला आता वेग येणार आहे.

गतिमान पध्दतीने हा रस्ता करण्यात यावा यासाठी आमदार अब्दुल सत्तार यांचा प्रयत्न आहे. आमदार अब्दुल सत्तार यांच्या पाठपुराव्याने गेल्या 50 वर्षांपासून प्रलंबित प्रश्न मार्गी लागल्याने या भागातील जनतेमध्ये उत्साहाचे वातावरण सावळदबारा सर्कॅल झाले आहे, अशी माहिती सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी दिली.

वनविभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेवर भेट देवून रस्त्याचा सीमा निश्चित केल्या. यावेळी फर्दापूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता अजय टाकसाळ, शाखा अभियंता नितीन राठोड, सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता जी.आर. पाटील, अभियंता चोपडे, चंडोल, शासकीय कंत्राटदार अशोक चव्हाण, जळगाव येथील सहाय्यक वनरक्षक उमेश गिरजधार, जळगाव वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल पंडित, वनसर्वेक्षक ए.बी. चव्हाण, गोंद्री येथील वनपाल सी.बी. महाजन आदींची उपस्थिती होती.

# येथे कर माझे जुळती ! रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा; सापडलेले 25 हजार रूपये केले परत

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अजूनही प्रामाणिकपणा जिवंत आहे याचे उदाहरण म्हणजे दि. 22 जुलै 2022 रोजी रूपात दुपारी दोन वाजेला दिनेश त्रिभुवन नामक व्यक्ती आपल्या हॉस्पिटलमध्ये ऍडमिट असलेल्या नातेवाईकांचे पैसे भरण्यासाठी पैसे घेऊन नगर नाकेहून रिक्षा करून क्रमांक एम.एच. 20 ई.एफ. 4976 या रिक्षाने वाळूजकडे जाण्यासाठी बसले.

रिक्षावाल्याने त्यांना उतरवून रिक्षा पंढरपूरकडे निघून गेली. त्या रिक्षामध्ये अजून दोन व्यक्ती बसलेल्या होत्या. त्यात एक महिला आणि एक पुरुष या दोघांना बाजूच्या सीटवर काही पैसे पडलेले दिसून आले त्यांनी रिक्षावाल्या भिकन पटेल यांना याची माहिती दिली भिकन पटेल यांनी हे पैसे कोणी गरजू व्यक्तीचे असतील म्हणून तात्काळ रिक्षा सीट न भरता सरळ नगर नाकाच्या दिशेने घेऊन गेले तिथे ड्युटीवर असलेले हेड कॉन्स्टेबल ट्राफिक अमजत पटेल यांना भेटले आणि आपल्याकडे इथून एक व्यक्ती बसणार होती पण ती उतरून गेली तिचे पैसे माझ्या गाडीत पडलेले आहे ते मी आपणाकडे देऊ इच्छितो तुम्ही ते त्या व्यक्तीपर्यंत पोहोचवावे अशी विनवणी करू लागले हेड कॉन्स्टेबल पटेल यांनी थोडा वेळ इथे थांबा आपण त्या व्यक्तीची वाट बघूया ती नक्कीच येथे शोधण्यासाठी येईल असे म्हणून त्यांना थांबवून घेतले.

थोड्या वेळातच दिनेश त्रिभुवन नगर नाक्यावर आपण जेव्हा रिक्षात बसलो होतो ही रिक्षा शोधण्यासाठी तिथे पोहोचले की रिक्षा शोधावी कशी म्हणून ते हेड कॉन्स्टेबल पटेल व कॉन्स्टेबल रतिराम धोत्रे यांना भेटले व आपले पैसे हरवल्याचे सांगू लागले हे ऐकतात त्यांनी बाजूला उभे केलेल्या रिक्षावाल्याला बोलवले व हीच व्यक्ती होती का हे विचारून ते पैसे दोघेही पोलीस सेवकांनी शहानिशा करून दिनेश त्रिभुवन यांच्या स्वाधीन केले हे सर्व घडत असताना तिथे हजर असलेले जे जे हॉस्पिटल चे डॉक्टर देवसिंग माहेर यांनी दिनेश त्रिभुवन यांना रिक्षावाले भिकन पटेल यांना प्रामाणिकपणाबद्दल बक्षीस देण्यास सांगितले. त्यावेळेस रिक्षावाल्यांनी आपल्याला बक्षीस वगैरे काही नको असे सांगून ते बक्षीस घेण्याचे टाळले तरीही त्रिभुवन यांच्या आग्रहास्तव पाचशे रुपये त्यांना त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल देण्यात आले यावरून असे दिसते की अजूनही प्रामाणिकपणा माणुसकी ही जिवंत आहे.






आधुनिक केसरी
प्रथम वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

आमच्याकडे पोकलेन योग्य
दरात किरायाने मिळतील

- : शुभेच्छुक :-



कैलासरावजी शिंदे
(कुंबेफळकर)
मो. 9423714505, 9284547410



होल्डिंग हॅन्ड्स
बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद
समाजाच्या हितासाठी एकमेकांचा हात धरून मानवी साखळी बनवूया.
संस्थेचे उद्देश
माणसे जोडणे । आरोग्य । शिक्षण । पर्यावरण । सांस्कृतिक
महिला लघु उद्योग आणि रोजगार । सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम


सुरेश सिरसीकर
संस्थापक/ अध्यक्ष


रविंद्र बनकर
उपाध्यक्ष


अपर्णा मेहता
सचिव

अधिक माहितीसाठी : 7020577693 । holdinghands092@gmail.com

# कन्नड तालुक्यातील ग्रामीण भागात आंतरमशागत कामांना वेग!

## पावसाने शेतशिवारात वाढले तण; पीक छोटे बेकामी गवत मोठे मजुरांची रोजंदारी वाढली

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ**

**कन्नड :** परिसरात गेल्या काही दिवसांपासून पाऊस सुरू होता. त्यामुळे शेतीची कामे ठप्प झाली होती. शनिवारी सूर्यदर्शन झाल्यानंतर शेतशिवारात शेत मशागतीच्या कामांना वेग आला आहे. निंदणी, कोळपणी, खुरपणी, बखरणे, फवारा मारणे अशा विविध कामांनी वेग धरल्याचे दिसून येत आहे. परिरात रोज कुठे ना कुठे पाऊस हजेरी लावत आहे. कधी रिपरिप तर कधी जोरदार अशी स्थिती मागील काही दिवस होती. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकांची कोळपणी, वखरणी करण्यासाठी वेळच मिळाला नाही. रोजच्या पावसामुळे शेतामध्ये पाणी असते. पिकांच्या शेत परिसरात गवताच्या तणाचा गराडाच पडलेला पहायला मिळत आहे.

एक तर काही दिवसापुर्वी शेतकऱ्यांना पाऊसाची अत्यंत गरज होती मात्र सलग सरी पाऊसामुळे बेकामी गवत बोकळले असल्याचे दिसत आहे. या गवतामुळे पिक तर दिसत नाही मात्र हिरवेगार राण झाले आहेत. परिसरात एकाच वेळी भरमसाठ उगवन झाल्यामुळे पिके निंदणीसाठी मजूर मिळेना, अशीदेखील परिस्थिती झाली निर्माण झाली आहे. यंदा निंदणीस दीडशे ते दोनशे रुपये रोजगारापासून सुरू झाला असून तो पार अडीचशे रुपयांपर्यंत गेला. पूर्ण दिवसभरात कधीही पावसाचे आगमन होते. अशावेळी निंदणीस अडथळा येऊ लागला. आता मजुराने जास्त वेळ काम करावे व त्याचा मोबदलाही त्यांना जास्त मिळावा, यासाठी उधळे कामांना जास्त पसंती दिली जात आहे. रोजंदारीऐवजी उधळे काम दुप्पट वेगाने होत आहे. पूर्ण क्षेत्राची किंमत ठरवून दिली जाते. मग ते काम मजूर सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत राबवून ती लवकर कशी पूर्ण होईल व जास्त रोजगार आपल्या पदरात कसा पडेल? या हिशेबाने ते काम पूर्णत्वास नेतो.



कन्नड तालुक्यातील, पिशोर, हस्ता, वासडी, निम्भोरा, मेहगांव, जैतखेड़ा, भारम्बा, भारम्बातांडा, वाड़ी, भिलदरी, नागद, वडनेर, चिखलठान, नाचनवेल, आड़गाव, कोलम्बी, हतनुर, बनशेन्द्रा, टापरगांव, बाहिरगांव, भोकनगांव आदी परिसरात शेतशिवारात आंतरमशागतीच्या कामाने वेग घेतल्याचे पहावयास मिळते. शेतीसाठी अत्याधुनिक अवजारे जरी निघाली असली तरी प्रत्यक्ष शेतात काम करणाऱ्या मजुरांची टंचाई नेहमीच जाणवते. रोजंदारीचे भाव है दिवसेंदिवस वाढते आहे. परिसरात निंदणी, कोळपणी, खुरपणी, वखरणे, फवारा मारणे अशा विविध कामांनी वेग धरला आहे. मजुरांची शेतकऱ्यांना शेतातील कामे मार्गी लावण्यासाठी बाहेर गावातील मजुरांना वाहनाव्दारे आणण्याची वेळ आली.

### पिकापेक्षा बेकामी गवतच मोठे

शेतशिवारात सध्या पिकापेक्षा गवतच मोठे दिसत आहे. पिके पिवळी पडून कोवळ्या पिकांची वाढ खुंटली आहे. तसेच शेतजमीन सध्या ओलीचिंब आहे. शेतजमीन सुकल्यानंतर शेतीकामांना वेग येणार आहे. या गवताला नियंत्रण करण्यासाठी शेतकरी नींदनी सोबत रायसनिक औषधीचा उपयोग करताना दिसत आहे. यावर शेतकऱ्यांना कृषि विभागाकडून मार्गदर्शन करण्याची गरज दिसत आहे.

# कानडगावमधील तरुण शेतकऱ्याची आत्महत्या!

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** गेल्या वीस वर्षांपासून रखडलेले पुनर्वसन, वेळेवर मिळत नसलेला मावेजा आदी बाबीला कंटाळून एका तरुणाने शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली, ही घटना कानडगाव (वेरूळ, ता. कन्नड) येथे शुक्रवारी (ता. २२) सकाळी घडली.
याबाबत अधिक माहिती अशी की, देवगाव रंगारी येथून वाहणाऱ्या येळगंगा नदीवर जवळपास अठरा ते वीस वर्षांपासून बृहत् लघु मध्यम प्रकल्पाचे काम व धरणग्रस्त कानडगाव या गावाचे पुनर्वसनाचे कामे गेल्या अठरा वर्षांपासून रखडलेले आहे. दरम्यान, कानडगाव येथील एकत्र कुटुंबातील तरूण शेतकरी कृष्णा उत्तम सावडे (३०) यांचे देखील घर पुनर्वसनात बाधित झाले असून, वडिलोपार्जित शेती प्रकल्पात गेली आहे. अवघ्या दोन एकरात घरदार चालवणे कठीण होऊन बसले. येणाऱ्या मावेजाच्या भरवशावर घेतलेल्या उधार उसनवारीने कर्जाचा डोंगर दिवसागणित वाढत असल्याने संबंधितांचा वसूलीसाठी तगादा सुरू होता. या दररोजच्या समस्येला कंटाळून शुक्रवारी सकाळी शेतात गेलेल्या कृष्णाने गळफास घेतला. कुटुंबातील नातेवाईक शेतात गेले असता सदरील घटना उघडकीस आली.
तसेच ही माहिती मिळताच देवगाव रंगारीचे सहायक पोलिस निरीक्षक अमोल मोरे, पोलिस उपनिरीक्षक देविदास खांडकुळे, बीट जमादार आप्पासाहेब काळे, पोलिस कर्मचारी मधुकर लहाने यांनी घटनास्थळी धाव घेतली. कृष्णास देवगाव रंगारी येथील ग्रामीण रुग्णालयात आणले असता वैद्यकीय अधिक्षक डॉ. नीलेश अहिरराव, वैद्यकीय अधिकारी डॉ. जैन यांनी मृत घोषित केले. कृष्णाच्या पश्चात आई, एक भाऊ, सात बहिणी, पत्नी, दोन मुली असा मोठा परिवार आहे. घटनेची नोंद देवगाव रंगारी ठाण्यात करण्यात आली आहे.




# होल्डिंग हँड्स पुणे शाखेची मोफत चित्रकला कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** होल्डिंग हँड्स पुणे शाखेतर्फे चित्रकला कार्यशाळा घेण्यात आली. यात चार ते तेरा वयोगटातील मुलांनी सहभाग नोंदविला. रेषांचा अभ्यास, रंग कसे भरायचे इत्यादी या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षक म्हणून सायली जैन यांनी काम पाहिले. यावेळी होल्डिंग हँड्स पुणे शाखेच्या जिल्हाध्यक्षा अपर्णा मेहता उपस्थित होत्या.
सुरेश सिरसीकर संस्थापक व अध्यक्ष असलेल्या औरंगाबादची होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्था ही राज्यभरात सक्रिय असून राज्यभरात या संस्थेच्या शाखा आहेत. राज्याच्या बाहेर ही पंजाब, गोवा व कर्नाटकात या संस्थेच्या शाखा आहेत. ही संस्था आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, सांस्कृतिक आणि सामाजिक बांधिलकी असलेले अनेक उपक्रम राज्य व राज्याबाहेर राबवित असते.



माळीवाडा : आज ग्रामपंचायत कार्यालय माळीवाडा येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच अनिता सुधाकर हेकडे, उपसरपंच कडूभाऊ कीर्तीकर, ग्रामपंचायत सदस्य मनेश गाजरे, धम्मपाल गायकवाड, ग्रामविकास अधिकारी, जी.व्ही. हारदे, पोलीस पाटील प्रमोद साठे, सुधाकर हेकडे, नंदकिशोर मुळे, विनोद देवतकर, ग्रामपंचायत कर्मचारी गणेश आस्वार, यादव शिंगारे, संगणक परिचालक भगवान बनसोडे आदी उपस्थित होते.






# दगाबाज सरकार पडणारच : आदित्य ठाकरे

आधुनिक केसरी न्यूज



**गंगापूर :** शिवसेनेचे नेते युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे आज गंगापूर शहरात शिवसंवाद दौऱ्यानिमित्त आले असता गंगापूर शिवसेना युवासेना महिला आघाडीच्या वतीने त्यांच्या सत्काराचे नियोजन छत्रपती शिवाजी महाराज चौकात करण्यात आले होते.
या प्रसंगी त्यांनी शिवसैनिकांना संबोधीत करताना म्हणाले की, शिवसेनेने या गद्दारासाठी काय कमी केले. पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे व स्व. बाळासाहेब ठाकरे यांना मिट्टी मारणाऱ्या माणसाला सर्वस्व देऊनही पाटीत खंजीर खूपसला असून शिवसैनिक अजून आक्रमक झालेला नाही. येणाऱ्या काळात सर्वांचे मुखवटे फाटणार असून दगाबाज सरकार पडणार आहे. यावेळी पावसाची सुरवात होताच पावसासारखा प्रेमाचा पाऊस माझ्यावर पडावा असे उदगार काढले. राजकारणात चांगल्या लोकांसाठी स्थान निर्माण असून यासाठी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढणार आहे. पुढील कार्यक्रमाला जात असताना कायगाव टोका येथे त्यांनी मराठा आरक्षणासाठी हुतात्मा झालेले काकासाहेब शिंदे यांना अभिवादन केले.
यावेळी मा.खासदार चंद्रकांत खैरे, आमदार अंबादास दानवे, कन्नडचे आमदार उदयसिंग राजपूत, नंदकुमार घोडले, मंदार चव्हाण, लक्ष्मण सांगळे, अविनाश पाटील, दिनेश मुथा, कृष्णा पाटील डोणगावकर, मच्छिन्द्र देवकर, सुभाष कानडे, विजय पानकडे, भागेश गंगवाल, आबासाहेब शिरसाठ, ऋषी धाट, प्रकाश जैस्वाल, लक्ष्मणसिंग राजपूत, पोपटराव गाडेकर, अर्जुन कऱ्हाळे, गोविंद वल्ले, करण खोमणे, आकाश लेकुरवाळे इत्यादी शिवसैनिक युवासैनिक व महिला मोठया संख्येने उपस्थित होते.

# सेवानिवृत्त अभियंता सलीम पटेल यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** खुलताबाद तालुक्यातील गंधेश्वर गावातील प्रमुख राहीवासी सलिम मदन पटेल यांचा गुरुवार रात्री ह्रदय विकराच्या तीर्व झटक्याने निधन यांचे झाले आहे. शुक्रवारी रोजी सकाळी औरंगाबाद येथील कब्रिस्तान मध्ये त्यांचा दफन करण्यात करण्यात करण्यात आली.
काही वर्षोंपूर्वीच ते पाटबंधारे विभागामध्ये अभियंता पदावरुन सेवानिवृत्त झाले होते.
त्यांचा स्वभाव मनमिळाऊ असल्याने गावात हळ-हळ व्यक्त करून त्यांचे जवळीक मित्र मंडळ सोशल मीडियावर श्रदांजली देत आहे, ते बोड़खा येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे कडू पटेल यांचे मोठे भाऊ होते तसेच औरंगाबाद येथील डॉ. जुबेर पटेल यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्च्यात एक मुलगा, दोन मूली, भाऊ, पत्नी असा परिवार आहे.

# कष्टाचे फळ उशिरा का होईना पण योग्यवेळी मिळते : सागर जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी रजिस्टर ट्रस्ट मुंबई आयोजित 22 व्या राज्यस्तरीय गुनिजन गौरव महासंमेलनाच्या दिमाखदार आणि अविस्मरणीय पुरस्कार सोहळ्यात जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव यांच्या कार्य कुशल कर्तुत्व नेतृत्व व उत्तम मार्गदर्शनाखाली जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाला विविध मान्यवरांच्या उपस्थित राज्यस्तरीय गुनिजन पुरस्काराने गौरविण्यात आले.
इतर चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर आपल्या शैक्षणिक व सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात यशाचे शिखर गाठणाऱ्या आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील निवडक व्यक्तींना तथा संस्थाना मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी रजिस्टर ट्रस्ट मुंबई समूहातर्फे दिनांक 17 जुलै रोजी सन्मानित करण्यात आले. इंटरनॅशनल टॅलेंट आयकॉन आंध्र प्रदेश डॉ. जे. सानीपिना राव, शिक्षण तज्ञ डॉ. हेमाली जोशी, ह.भ.प. श्यामसुंदर महाराज आळंदीकर यांच्या हस्ते जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव यांना सन्मानित करण्यात आले. आकर्षक सन्मानचिन्ह खास मानपत्र मानकरी बॅच आणि मानाचा फेटा असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.
आपले मनोगत व्यक्त करताना सागर जाधव म्हणाले की, समूहाकडून मिळालेले पुरस्कारामुळे केलेल्या कामाचे फलित झाले आहे. हा पुरस्कार म्हणजे जिजामाता परिवाराने केलेल्या शैक्षणिक सामाजिक व सांस्कृतिक कार्याचा केलेला सन्मान आहे. हा पुरस्कार जिजामाता परिवाराची जबाबदारी वाढवणारा आणि पुढील प्रगतीसाठी स्फूर्ती देणार आहे. तसेच ही आमच्या सगळ्या समुहाची मेहनत आहे, मेहनतीचे फल उशिरा का होय ना मात्र योग्य वेळी मिळतात, असे प्रतिपादन करण्यात आले.



# कृष्णा इंटरनॅशनल, गौताळा व्हॅलीमधील नववी दहावीचे वर्ग बंद करण्याचे आदेश

## शासकीय मान्यता नसताना लाखो रुपये फीस उकळली असल्याचे प्रकरण




आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शासकीय मान्यता नसताना लाखो रुपयांची फीस उकळून नववी व दहावीच्या वर्गात प्रवेश देणाऱ्या कन्नड शहरातील कृष्णा इंटरनॅशनल स्कूल आणि गौताळा व्हॅली स्कूलवर शिक्षण विभागाने कारवाई केली आहे हे दोन्ही वर्ग बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहे.
कन्नड शहरातील कृष्णा इंटरनॅशनल स्कूल मध्ये नववीत २५ तर दहावी मध्ये १८ विद्यार्थ्यांना तसेच गौताळा व्हॅली स्कूलमध्ये नववीच्या वर्गात २४ आणि दहावी मध्ये २० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे याकरिता संस्था चालकांनी पालकांकडून भरमसाठ फी वसूल केलेली आहे, आता शाळा सुरू होऊन महिना लोटला असताना या शाळांचा बोगसपणा उघडकीस आला आहे. या शाळांनी मान्यता नसताना सुरू केलेले वर्ग बंद करण्याचे तसेच विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्यता प्राप्त शाळात वर्ग करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहे, यामुळे या विद्यार्थ्यांना आता कोणत्या शाळेत प्रवेश घ्यावा असा प्रश्न निर्माण झाला आहे, तसेच विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्यांवर कारवाई करा विद्यार्थ्यांच्या भवितव्यासोबत खेळणाऱ्या या संस्थाचालकावर कडक कारवाई करण्यात यावी. या शाळांची मान्यता कायमस्वरूपी काढून टाकावी व पालक आणि विद्यार्थ्यांना फीस परत करण्यात यावी, अशी मागणी पालकांकडून जोर धरत आहे. शिक्षण विभागाने शाळेवर नियंत्रण ठेवून यांच्यावर कड़क कार्यवाही करावी तसेच अश्या प्रकारच्या अनेक शाळा ग्रामीण भागात ही अनाधिकृत चालू असल्याची चर्चा होत आहे.

**वरिष्ठांच्या आदेशानुसार या दोन्ही शाळेची चौकशी केली असता इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत मान्यता असून इयत्ता नववी व दहावी मान्यता मिळालेली नसल्याचे स्पष्ट झाले. या संस्थाचालकांना दंड आकारला जाऊ शकतो. या शाळेतील नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना मान्यता प्राप्त शाळांमध्ये शिफ्ट करावे, असे आदेश देण्यात आले आहे तसेच परिसरातील विविध शाळेत जाऊन तपासणी करण्यात येणार आहे.**

**दिलीप सिरसाठ,**
**गट शिक्षण अधिकारी कन्नड**

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## पाळी आली रे आली....

आधुनिक केसरी

मुलींच्या आयुष्यात पाळी हा शब्द खूप महत्त्वपूर्ण आहे. मासिक पाळी सुरु झाली की मुलगी वयात येते आणि तीचं स्त्री म्हणून खरं जीवन सुरू होतं. आयुष्याच्या अनेक टप्प्यांवर ही स्त्री कोणाची मुलगी असते, कोणाची बहीण असते, कोणाची पत्नी असते, आई असते, आजी असते या सगळ्या जबाबदाऱ्या मुलींना आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर समर्थपणे पेलायच्या असतात.
मुलगी वयात आली की तिच्या शीररातही बदल व्हायला सुरुवात होतो, काखेत, जांघेत, हात, पाय यावर केसांची लव येणे, मुलांच्या उंचीपेक्षा मुलींची उंची झपाट्याने वाढणे, पिंपल्स येणे, घाम येणे, बाह्यांगातून स्त्राव येणे, तसेच छातीचा भाग मोठा होण्यास सुरुवात होणे असे बदल नैसर्गिकरीत्या सुरू होतात.
मासिक पाळी या यापैकीच एक महत्त्वाचा भाग असून वयाच्या ८ व्या वर्षापासून ते १६ व्या वर्षापर्यंत ती कधीही सुरु होऊ शकते. हा एक नैसर्गिक भाग असून शरीरात जेव्हा इस्ट्रोजन आणि प्रोजेस्टेरॉनच्या मात्रा कमी जास्त होऊन, बीजांड बाहेर येण्यासाठी तसेच प्रजनन क्रियेसाठी तिची परिपक्वता झालेली असते, पाळी ही ३ ते ५ दिवसांची असते. याकाळात स्त्रीच्या अंगावरुन वाहणारा प्रवाह हा गाठीच्या स्वरूपात असतो आणि तो चौथ्या किंवा पाचव्या दिवशी बंद होतो. या काळात स्त्री शरीरात झालेले बदल पूर्ववत होतात. पाळीच्या अकराव्या ते पंधराव्या दिवसात बीजांड हे बाहेर पडते आणि त्याला 'पिक पीरियड' असे म्हणतात. कारण या काळात जर स्त्रीचा पुरुषांशी संबंध आला तर गर्भधारणा होण्याची शक्यता खूप जास्त असते. ही पाळी वयाच्या ४० ते ५० वर्षांच्या काळात बंद होऊन जाते. यालाच आपण रजोनिवृत्ती असे म्हणतो. __पाळीच्या या काळात स्त्रियांना स्तनांमध्ये दुखणे, चिडचिडेपणा, चेहऱ्यावर पिंपल्स येणे असे अनेकविध त्रास होत असतात. जेव्हा मुलगी सातवी, आठवीमध्ये जाते तेव्हा पाळीला सुरुवात होते. त्यामुळे तिला या गोष्टींची पूर्णकल्पना देणे खूप आवश्यक असते. कारण मुलगी शाळेत असताना, किंवा बाहेर कुठे असताना जर पाळीचा रक्तस्ताव झाला तर ती गोंधळून जाते, घाबरते आणि ती मानसिक **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# गुलाबराव पाटलांचा झटका

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** जिल्ह्यात शिंदे गट आणि शिवसेनेत आता राजकीय द्वंद्व पहायला मिळत आहे. आता माजी मंत्री आणि शिंदे गटातील नेते गुलाबराव पाटील यांच्या पुढाकारातून जिल्हा रुग्णालयाला देण्यात आलेली रुग्णवाहिकाही शिंदे गटाकडून परत घेण्यात आली आहे.
गेल्या वर्षी मंत्री तसेच युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्ताने गुलाबराव पाटील यांच्या पाठपुराव्यातून श्रीकांत फाउंडेशनच्या सहकार्यातून जिल्हा रुग्णालयाला रुग्णवाहिका देण्यात आली होती. मात्र आता गुलाबराव पाटील यांनी शिवसेना सोडून शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यामुळे आता ही रुग्णवाहिका शिवसेनेच्या ताब्यातून परत घेण्यात आली आहे.
गुलाबराव पाटील यांच्यासह जळगाव जिल्ह्यातील पाच आमदारांनी एकनाथ शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यांच्या प्रवेशानंतर गुलाबराव पाटील यांच्यावर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांकडून आरोप-प्रत्यारोप करण्यात येत आहेत. दुसरीकडे गुलाबराव पाटील यांच्याकडूनही त्यांना प्रतित्युर दिले जात आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in